सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. २८ डिसेंबर २०२५ | वर्ष – ३ रे | अंक २६१ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## थोडक्यात...

### अजित पवार शिवसेनेशी चर्चा करणार

**पुणे :** उपमुख्यमंत्री अजित पवार पुण्यात आघाडी संदर्भात शिवसेनेशी चर्चा करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. शरद पवारांनी महाविकास आघाडीसोबत जाण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानंतर अजित पवारांकडून पुण्यात आघाडीसाठी चाचपणी सुरू झाली असल्याची सूत्रांकडून माहिती मिळेतय. त्याचाच भाग म्हणून शिवसेनेसोबत आघाडीबाबत बोलणी करण्याचा प्रयत्न अजित पवार करणार असल्याचं सूत्रांनी सांगितलंय.

### दोन्ही राष्ट्रवादींची चर्चा फिस्कटली?

**पुणे :** दोन्ही राष्ट्रवादी पुण्यात एकत्र येत असल्याची चर्चा सुरू असताना आता त्यामध्ये ट्विस्ट आला आहे... दोन्ही राष्ट्रवादीची संभाव्य युती आता जवळपास फिस्कटल्याची माहिती आहे. घड्याळ की तुतारी, कोणत्या चिन्हावर लढायचं यावरुन ही युती फिस्कटल्याची समजतंय. तसेच दुसरीकडे शरद पवारांच्या पक्षाने मविआसोबत चर्चा सुरू केल्याने युती फिस्कटल्याच्या चर्चांना बळ मिळालंय. त्यामुळे आता पुण्याचं राजकारण वेगळ्याच वळणावर आलं आहे. गेल्या काही दिवसांपासून पुण्यात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याची जोरदार चर्चा होती. स्थानिक नेते त्यासाठी प्रचंड आग्रही होते. त्यांच्यामध्ये अनेक बैठकाही पार पडल्या होत्या. पण आता दोन्ही राष्ट्रवादीची युतीची चर्चा फिस्कटल्याची सूत्रांची माहिती आहे.

### अरुण गवळीच्या कन्या रिंगणात

**मुंबई :** अरुण गवळी यांच्या कन्या गीता गवळी आणि योगिता या निवडणूक रिंगणात उतरल्या आहेत. गीता यांनी प्रभाग क्रमांक २१२ आणि योगिता यांनी प्रभाग क्रमांक २०७ मधून उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांनी अखिल भारतीय सेनेमधून अर्ज दाखल केले आहेत. २३ डिसेंबर रोजी एकूण ४ हजार १६५ अर्जाचे तर, २४ डिसेंबर रोजी २३ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांतून मिळून एकूण २ हजार ८४४ उमेदावरी अर्जाचे वितरण झाले होते. तसेच, २ अर्ज दाखल झाले होती. नामनिर्देशन पत्रे वितरणाच्या तिसऱ्या दिवशी शुक्रवारी २ हजार ४० उमेदवारी अर्जाचे वितरण झाले आहे. तर, ७ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. दरम्यान, गीता या माजी नगरसेवक आहेत. त्या आधी सलग निवडून आल्या आहेत. योगिता या पहिल्यांदाच रिंगणात उतरल्या आहेत.

### आदित्य ठाकरेंनी काढली मशाल रॅली

**छत्रपती संभाजीनगर :** संभाजीनगरमध्ये आदित्य ठाकरेंनी मशाल रॅली काढली. त्यानंतर त्यांनी थेट जीपवर चढून भाषण केलं. आदित्य ठाकरे जीपवर चढून कमरेवर हात ठेवून सत्ताधार्यांवर हल्लाबोल चढवला. त्यांच्या या कृतीनं थेट बाळासाहेब ठाकरेंची आठवण ताजी झाली. १९६८ साली बाळासाहेब ठाकरेंनी मुंबईत गेट वे ऑफ इंडियासमोर गाडीवर चढून भाषण केलं होतं. आदित्य ठाकरेंच्या जीपवरील भाषणानं तब्बल ५७ वर्षांपूर्वीच्या बाळासाहेबांच्या भाषणाच्या घटनेला उजाळा मिळाला. यावेळी आदित्य ठाकरेंनी संस्थान गणपतीला श्रीफळ वाहून महापालिका प्रचाराचा शुभारंभ केला.

### शक्य तिथे आघाडीचा आदेश

**मुंबई :** मुंबई काँग्रेस वंचित आघाडीबाबत विजय वडेट्टीवार यांनी मोठे वक्तव्य केले आहे. जिथे शक्य तिथे आघाडी करा असा आदेश आहे. भाजपला आघाडी केलेले पक्ष सोडून आम्हाला समविचारी पक्षाशी आघाडी करण्याच्या सूचना आम्ही दिलेत. मुंबई येथे देखील स्थानिक नेत्यांना अधिकार देण्यात आले आहेत. त्यामुळे आज किंवा उद्या मध्ये अंतिम निर्णय होईल. जागा वाटपात आकडेवारी इकडे तिकडे होऊ शकेल. प्रत्येकानी दोन पाऊले मागे घेऊन कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर केला पाहिजे. मी त्या प्रक्रियेत नाही. त्यामुळे मुंबईच्या नेत्यांशी चर्चा केल्यावर सांगू शकेल, असे वडेट्टीवार म्हणाले.

### भीमाशंकर मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी ९ जानेवारी पासून बंद राहणार

**पुणे :** भिमाशंकर मुख्य मंदिराच्या सभा मंडपाचे नव्याने काम होणार असल्याने दुर्घटना घडु नये यासाठी मुख्य मंदिर दर्शानासाठी तीन महिने बंद रहाणार आहे. श्री.भीमाशंकर ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत झालेल्या संयुक्त बैठकीत सविस्तर चर्चा करून सर्वाच्या सहमतीने मंदीर तीन महिन्यासाठी बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. महाशिवरात्रीचा दि. १२ ते १८ फेब्रुवारी२०२६ हा सात दिवसाच्या कालावधी वगळण्यात आलेला असून या कालावधीत मंदीर भाविकांकरिता दर्शनाकरिता खुले राहणार आहे.

### शेतकऱ्यांनी महामार्ग रोखला

**मनमाड :** इंदोर मनमाड रेल्वे मार्गाच्या जमीन अधिग्रहण दर कमी असल्याने शेतकऱ्यांनी महामार्ग रोखला. मालेगाव तालुक्यातील चोंडी गावाजवळ महामार्ग रोखला. मनमाड इंदोर रेल्वे मार्गाच्या जमीन अधिग्रहण मध्ये शेतकऱ्याच्या जमिनींना कवडीमोल भाव आकारल्याने शेतकरी आक्रमक झाले आहेत. शासनाने मागण्या मान्य करण्यासाठी शेतकऱ्यांचा महिनाभरातील तिसरा रस्ता रोको केला.

# विहिरीतील मोटार काढताना विजेचा धक्का लागून चौघांचा जागीच मृत्यू

## तुळजापूर तालुक्यातील केशेगाव येथील हृदयद्रावक घटना

**धाराशिव :** जिल्ह्याच्या तुळजापूर तालुक्यातील केशेगाव येथे



विजेच्या धक्क्याने चौघांचा जागीच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. मृतांमध्ये वडील, मुलगा आणि दोन मजुरांचा समावेश आहे. गावातील गणपत साखरे यांच्या शेतात विहिरीतील मोटार काढण्याचं काम सुरू होतं. क्रेनच्या सहाय्याने ही मोटार बाहेर काढली जात असताना क्रेनचा वरील भाग महावितरणच्या विद्युत हायव्होल्टेज तारेला स्पर्श झाल्याने क्रेनमध्ये करंट उतरल्याची धक्कादायक घटना घडली. त्यात, मोटार काढण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या चौघांचाही जागेवरच मृत्यू झाला. या हृदयद्रावक घटनेनं परिसरात हळहळ पसरली आहे.

क्रेनच्या सहाय्याने विहिरीतील मोटर काढत असताना विजेचा धक्का लागल्याने शेतकरी कुटुंबातील बाप-लेकासह शेतातील मजूरांचाही दुर्दैवी मृत्यू झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. एकाच वेळी चार जणांचा बळी गेल्याने गावात शोककळा पसरली असून तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली असून पोलिस पुढील तपास करत आहेत. दुर्घटनेतील सर्व मृतांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात नेण्यात येत आहेत.

या दुर्घटनेत कासिम कोंडीबा फुलारी (वय ५४) आणि त्यांचा अवघा १६ वर्षांचा मुलगा रतन कासिम फुलारी यांचा जागीच मृत्यू झाला. वडिलांच्या मदतीसाठी आलेल्या रतनचा असा दुर्दैवी अंत झाल्याने प्रत्येकाचे डोळे पाणावले. याच घटनेत रामलिंग नागनाथ साखरे (वय ३०) आणि नागनाथ साखरे (वय ५५) यांचाही करुण अंत झाला. दोन्ही कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून कुटुंबीयांचा आक्रोश पाहून अनेकांचे डोळे पाणावले.




**अमरावती :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अमरावती येथे महात्मा फुले अर्बन को-ऑप. बँक लि. अमरावतीच्या वतीने बँकेचे अध्यक्ष दिलीपराव लोखंडे आणि संचालक मंडळ यांनी अतिवृष्टीग्रस्तांसाठी 'मुख्यमंत्री सहाय्यता निधी'मध्ये ५ लाख देणगीचा धनादेश सुपूर्द केला. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांचे आभार मानले.

# मलिकांच्या कुटुंबातून तिघांना उमेदवारी

**मुंबई :** राज्यात महापालिका निवडणुकीचं बिगूल वाजलं आहे, निवडणूक आयोगाकडून निवडणूक कार्यक्रमाची घोषणा करण्यात आली आहे.

येत्या १५ जानेवारी रोजी महापालिका निवडणुकीसाठी मतदान होणार आहे, तर १६ जानेवारी रोजी मतमोजणी होणार आहे. दरम्यान महापालिका निवडणुकीसाठी आता उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली असून, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते नवाब मलिक यांच्या कुटुंबातील तीन जण महापालिकेची निवडणूक लढवणार आहेत. यामध्ये नवाब मलिक यांचे भाऊ कप्तान मलिक, नवाब मलिक यांच्या बहीण डॉ. सईदा खान आणि कप्तान मलिक यांच्या सून बुशरा नदीम मलिक हे तिघे निवडणूक लढवणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून मलिक कुटुंबातून यंदा ३ जण निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

नवाब मलिक यांचे भाऊ कप्तान मलिक हे प्रभाग क्रमांक १६५, नवाब मलिक यांची बहीण डॉ. सईदा खान या प्रभाग क्रमांक १६८ तर कप्तान मलिक यांची सून बुशरा नदीम मलिक या प्रभाग क्रमांक १७० मधून निवडणूक लढणार आहेत. कप्तान मलिक यांचा प्रभाग १७० सध्या महिला राखीव झाल्याने, कप्तान मलिक यांनी या वार्डात आपल्या सुनेला निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्याचा निर्णय घेतला आहे, तर ते स्वतः प्रभाग क्रमांक १६५ मधून निवडणूक लढवणार आहेत. एकाच कुटुंबातील तीन जण निवडणूक लढवणार असल्यानं चर्चेला उधाण आलं आहे. दरम्यान मुंबईमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गट महापालिकेची निवडणूक स्वबळावर लढणार आहे.

# 'जेन-झी'वर माझा विश्वास : पंतप्रधान मोदी

**नवी दिल्ली :** जेन-झी पिढीच्या मुलांवर माझा विश्र्वास असून, हीचे मुले भारताला 'विकसित राष्ट्र' बनवतील, असा विश्र्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे 'वीर बाल दिवसा'निमित्त आयोजित राष्ट्रीय कार्यक्रमात भाषण केले. वीर बाल दिवस हा गुरू गोविंद सिंग यांच्या साहिबजादे-जोरावर सिंग आणि बाबा फतेह सिंग यांच्या अद्वितीय बलिदानाच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. यावेळी पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज आपण त्या शूर साहिबजादांचे स्मरण करत आहोत, जे आपल्या भारताचा अभिमान आहेत. ते भारताच्या धैर्याचे आणि शौर्याचे प्रतीक आहेत. वय आणि परिस्थितीच्या सीमा तोडणारे हे शूरवीर आहेत. ज्या राष्ट्राचा इतका गौरवशाली भूतकाळ आहे, ज्यांच्या तरुण पिढीला अशी प्रेरणा वारशाने मिळाली आहे.

माझ्या देशाची तरुण पिढी आज या कार्यक्रमात आहे. एका अर्थाने, तुम्ही सर्व 'जेन-झी' आहात. काही 'जेन-अल्फा' देखील आहात. तुमची पिढी भारताला विकसित भारताच्या ध्येयाकडे घेऊन जाईल. मला प्रामाणिकपणे वाटते की, केवळ वयाने कोणीही लहान किंवा मोठा होत नाही. प्रत्येकाचे कर्तृत्व त्याला लहान-मोठा बनवत असते. तुम्ही तुमच्या कामातून आणि कामगिरीतून महान बनता.



अगदी लहान वयातही तुम्ही अशी कामे करू शकता की इतर लोक तुमच्याकडून प्रेरणा घेऊ शकतात. तुम्ही भारताचे भविष्य आहात, असा मोलाचा संदेश मोदी यांनी युवांना दिला.


पंतप्रधानांनी संस्कृतमधील एका श्र्लोकाचा उल्लेख करत सांगितले की, एखादे लहान मूल जर ज्ञानाची गोष्ट सांगत असेल, तर ती स्वीकारली पाहिजे. त्यांनी तरुण वयात उल्लेखनीय यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. तुम्ही कमी वयात मोठी कामे करू शकता, आणि तुम्ही ते करून दाखवले आहे. मात्र, या यशाकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. तुमची स्वप्ने आकाशापर्यंत न्या. देश ठाम निर्धाराने तुमच्या पाठीशी उभा आहे, असे त्यांनी सांगितले.

भूतकाळातील निराशेची आजच्या संधींशी तुलना करताना पंतप्रधान म्हणाले की, पूर्वी तरुण स्वप्ने पाहण्यास घाबरत होते, कारण जुन्या व्यवस्थेमुळे निराशेचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र आता देश प्रतिभेचा शोध घेत आहे आणि १४० कोटी नागरिकांच्या ताकदीवर आधारित भक्कम व्यासपीठ उपलब्ध करून देत आहे. त्यांनी इंटरनेट, स्टार्टअप मिशन आणि लक्षीत विकासासाठी उभारलेल्या विविध प्लॅटफॉर्म्सचा उल्लेख केला.

पंतप्रधान मोदी यांनी आपल्या भाषणात नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी)वर विशेष भर दिला. हे धोरण पाठांतराऐवजी व्यावहारिक शिक्षण, चिकित्सक विचारसरणी आणि प्रश्र्न विचारण्याला प्राधान्य देते, असे त्यांनी सांगितले. पहिल्यांदाच सरकार नव्या शिकण्याच्या आणि विचार करण्याच्या प्रक्रियेच्या विकासावर अधिक लक्ष केंद्रित करत असल्याचे त्यांनी नमूद केले. नवकल्पना आणि डिझाइन थिंकिंगला चालना देण्यासाठी अटल टिंकरिंग लॅब्सच्या भूमिकेचेही त्यांनी कौतुक केले.





# उपमुख्यमंत्री अजित पवार अचानक 'नॉट रिचेबल'

*__पुणे :__ अजित पवार अचानक नॉट रिचेबल झाले. हेच नाही तर पोलिसांचा मोठा फौजफाटाही तिथेच बाहेर त्यांची वाट पाहात राहिला. पायलट कार आणि सर्व सुरक्षा सोडून अजित पवार एकटेच निघून गेले. यामुळे बैठकीत नेमकं काय घडलं की, अजित पवार एकटेच निघून गेले यावरून विविध चर्चा या रंगताना दिसत आहेत. पुण्यात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार नसल्याचे आता जवळपास स्पष्टच आहे. अजित पवार नॉट रिचेबल झाल्याने राज्यातील राजकारणात मोठी खळबळ उडाली.*

# वसई विरारमध्ये मनसे-'बविआ' युती

**मुंबई :** एकीकडे मुंबईसह अनेक ठिकाणी ठाकरे बंधू एकत्र लढणार असल्याचं जाहीर झाल्यानंतर वसई विरारमध्ये मात्र चित्र काहीसं वेगळं आहे. वसई विरार महापालिकेमध्ये राज ठाकरे यांची मनसे आणि हितेंद्र ठाकूर यांची बहुजन विकास आघाडी एकत्र लढणार आहेत. महत्त्वाचं म्हणजे मनसेचे उमेदवार हे बविआच्या शिट्टी या चिन्हावर लढणार आहेत. त्याचवेळी ठाकरेंची शिवसेना मात्र स्वतंत्र लढणार आहे.

मुंबईत ठाकरे बंधूंनी पत्रकार परिषद घेत अखेर राजकीय युती जाहीर केली आणि बहुतांश ठिकाणी एकत्र लढण्याचा निर्धारही केला. मात्र अवघ्या काही दिवसांतच त्याला पहिला सुरूंग वसई विरारमध्ये लागला. वसई विरारमध्ये दोन्ही ठाकरे बंधूंचे पक्ष वेगवेगळे लढणार आहेत. सोबत लढायचं असेल, भाजप-शिंदेंच्या शिवसेनेला सत्तेपासून दूर ठेवायचं असेल तर आमच्या चिन्हावर लढा अशी बविआची अट होती. मनसेने ती मान्य केली, मात्र ठाकरेंची शिवसेना वेगळी लढणार आहे.




लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लातूरच्या प्रिन्स सोनवणेची चमकदार कामगिरी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २७ डिसेंबर :** भारतीय शालेय खेळ महासंघ तसेच उत्तर प्रदेश माध्यमिक शिक्षण विभाग, सहारनपूर (उत्तर प्रदेश) यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. भीमराव आंबेडकर स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, सहारनपूर येथे आयोजित राष्ट्रीय पातळीवरील कुराश क्रीडा स्पर्धेत स्वामी विवेकानंद विद्यालय, लातूरचा विद्यार्थी प्रिन्स प्रिया विलास सोनवणे याने ३५ किलो वजन गटात महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करत सिल्वर पदक पटकावले. देशभरातून सहभागी झालेल्या खेळाडूंमध्ये उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रिन्सने देशात दुसरा क्रमांक मिळवून महाराष्ट्रासह आपल्या शाळेचे नाव देशपातळीवर उज्वल केले आहे.

विशेष म्हणजे, प्रिन्स सोनवणे याने यावर्षीच्या शालेय क्रीडा सिझनमध्ये विभागीय कुस्ती, बॉक्सिंग, बेसबॉल व जुदो या विविध खेळांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. जुदो कुस्तीमध्ये त्याने ब्राँझ मेडल पटकावले, त्यानंतर राज्यस्तरीय कुराश स्पर्धेत गोल्ड मेडल जिंकून राष्ट्रीय स्पर्धेचे तिकीट निश्चित केले. पुढे राष्ट्रीय कुराश स्पर्धेतही आपला लौकिक कायम राखत त्याने महाराष्ट्रासाठी सिल्वर मेडलची कमाई करून दिली.



# मराठवाड्याच्या सर्वांगीण विकास साधायचा तर साहित्य संस्कृती विकसीत करावीच लागेल : डॉ.नागोराव कुंभार

**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरुर अनंतपाळ, दि.२७ :** मराठवाड्याचा खऱ्या अर्थाने सर्वांगीण विकास साधायचा असेल तर, या विभागातील राजकीय नेते, कलावंत, लेखक, समीक्षक, वाचक यांच्यासोबत काम करणार्या प्रशासनातील वरिष्ठ अधिकार्यांनी येथे साहित्य संस्कृती वाढीस लागण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतील,त्यासाठी अशा प्रकारची लहान मोठी साहित्य संमेलनेही पुरक ठरतील असे प्रतिपादन थोर विचारवंत डॉ. नागोराव कुंभार यांनी येथे केले.

मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या अनुदानातून, श्री अनंतपाळ नवयुवक वाचनालय यांच्यावतीने दि.२७ ते २८ डिसेंबर २०२५ या दिवशी मोरया लॉन्स येथील स्मृतीशेष शिवराज पाटील चाकूरकर मराठी साहित्य नगरीतील, मातोश्री हरिबाई माधवराव पाटील मंचावर आयोजित ग्रंथ रसिक जिल्हास्तरीय मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी संमेलनाध्यक्ष पदावरुन डॉ.नागोराव कुंभार बोलत होते.

मंचावर संमेलन उद्घाटक प्रा.डॉ.रणधीर शिंदे, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे राज्याचे अध्यक्ष डॉ.गजानन कोटेवार, मुख्यमंत्री सचिवालयातील प्रशासकीय अधिकारी कवयित्री डॉ.मंजुषा कुलकर्णी, माजी जि.प.उपाध्यक्ष ऍड.संभाजी पाटील, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष प्रा.श्रीधर नांदेडकर, राज्य ग्रंथालय संघाचे कार्योपाध्यक्ष राम मेकले, ज्येष्ठ साहित्यिक धनंजय गुडसूरकर, छत्रपती संभाजी नगरचे सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे,गडचिरोली जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनील गजभारे, ग्रंथमित्र युवराज जाधव,ज्येष्ठ शिक्षण तंत्र प्रभाकरराव कुलकर्णी, ज्येष्ठ साहित्यिक प्रा. फ.म.शहाजिंदे, ज्येष्ठ साहित्यिक दगडू लोमटे, अरुणा प्रकाशनचे राजकुमार बिरादार,श्री अनंतपाळ नवयुवक वाचनालयाचे अध्यक्ष तथा संमेलनाचे स्वागताध्यक्ष एल.बी.आवाळे, सचिव डॉ. राजकुमार बोपलकर आदिंची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ.नागोराव कुंभार म्हणाले की, आपणाला अर्थपूर्ण जीवन जगायचे असेल तर अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आदी मुलभूत सुविधांची गरज असते तद्वतच मनाचीही जडणघडण होण्यासाठी लागणार्या गरजा पूर्ण करण्याचे काम साहित्य,तत्वज्ञान करत असते. किंबहुना त्या केवळ तंत्रज्ञान, विज्ञानाने पूर्ण होणार नाहीत. कोणताही समाज अथवा देशाला पुढे जायचे असेल तर विचारांची गरज भासते, ते मोठ्या व्यक्तींकडून मिळते त्याला देशाची सीमा नसते, ते वैश्विक असतात.जे समाजाची वैचारिक धारणा पुढे नेते. कोणताही देश आणि समाज त्या देशातील राज्यकर्त्या नेत्यांमुळे ओळखला जात नाही तर तिथे असलेले कलावंत, साहित्यिक, विचारवंत यामुळे जगात ओळखला जातो. मीठाशिवाय जेवणाला चव नाही, तसे जीवनात तत्वज्ञान नसेल तर जीवन निरस आहे.सक्षम समाजमन, माणूस घडविण्याचे काम साहित्य तत्वज्ञान करते. सुख-दुःखाच्या तीव्र दृष्टिकोणाशिवाय दर्जेदार साहित्य निर्माण होत नाही. आज देशाचं नेतृत्व करणार्यांनी साहित्य,तत्वज्ञानाकडं दुर्लक्ष झाल्याने अधःपतन झाले आहे. जेव्हा जेव्हा नेतृत्वाचा, समाजाचा तोल जातो तेव्हा त्याला आधार देण्याचे काम साहित्य करते.म्हणून साहित्याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. दर्जेदार साहित्य नसेल तर समाज असुरक्षित राहतो असे सांगून अशी साहित्य संमेलने महत्वाची ठरतात, असे ठाम प्रतिपादनही डॉ. नागोराव कुंभार यांनी यावेळी केले.

ज्येष्ठ तत्वज्ञ डॉ.सुरेंद्र बारलिंगे यांनी प्रत्येक तालुक्यात सांस्कृतिक केंद्रे उभारावीत,




त्यात नाट्यगृह, ग्रंथालय असावे तिथे लेखन शिबीर, लेखक कलावंतांचे येजा असावी जेणे करुन नव्या पिढीला त्याचा लाभ होईल, कुटुंब,शाळा, महाविद्यालये, धर्मसंस्था, राजकारणी यांच्यावर संस्कार करण्याचे काम साहित्यामुळे होईल, बहुजन समाजात आकलन शक्ती नाही, त्यासाठी अशी संमेलने साह्यभूत ठरतील. हे ओळखून यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्य साहित्य, संस्कृती अनुदान मंडळ सुरु केल्याचे त्यांनी सांगितले.

माहिती तंत्रज्ञान आणि एआयने मानवी जीवन व्यापले आहे, स्मार्ट फोनमध्ये जग जवळ आले असले तरी समाज हरवतो आहे, धार्मिक बुरसटलेपण येवून माणसाचं स्वांतत्र हिरावलं जातंय, धार्मिक उन्मान वाढतो आहे, राजकीय जीवन अस्वस्थ आहे. गावगाडा फुटीच्या वाटेवार आहे.शेती संकटात आहे. महर्षी शिंदे यांनी म्हटल्याप्रमाणं व्यापारी, भांडवलदार, दलालांनी शेतीव्यापार ताब्यात घेतला आहे.अशा वेळी या सर्व बदलाावर साहित्याने ठामपणे बोलले पाहिजे.आजचा लेखक यावर तीव्रपणे व्यक्त होत नाही. तशी शक्यता दिसत नाही,तथापि खेड्यात काही अंशी प्रतिभेचा उन्मेष दिसतोय. आजच्या साहित्य संमेलनामधून साहित्याची केंद्रे बहरत जावीत अशी अपेक्षा व्यक्त करुन या संमेलनाचे उद्घाटन झाल्याचे डॉ.रणधीर शिंदे यांनी यावेळी जाहीर केले.

विशेष अतिथी डॉ.मंजुषा कुलकर्णी यांनी मराठी भाषा ही जगातल्या ४२ देशात बोलली जाते. देशात ती ४ स्थानावर बोलली जातेय.दरवर्षी देशात १० ते १२ हजार मराठी भाषेतील ग्रंथ प्रकाशित होतात, ती रोजच्या जगण्यात,वागण्यातून व्यक्त झाली पाहिजे, असे सांगून मराठीचा आग्रह धरावा. तिचाव्र प्रेम करा, ती मायभाषा आहे तिची लाज वाटू नये, ज्ञानविज्ञान ज्या भाषेतून दिले जाते तिथे विकास होतो. मराठवाड्यातील संतांनी मराठी भाषेत मोलाचे योगदान दिले आहे असे सांगितले आणि यापुढे वाचकांचा सत्कार केला जावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

साने गुरुजी, विनोबा भावे यांच्या साहित्यामुळे समाजाला मोठा आधार मिळाला, सार्वजनिक ग्रंथालय चळवळीमुळे साहित्य विश्व समृध्द व्हायला मदत होतेय, ग्रंथामध्ये माणसाला घडविण्याची धमक आहे असे मत डॉ.गजानन कोटेवार यांनी व्यक्त केले.

तर साहित्यिक देविदास फुलारी यांनी साहित्य संमेलनाची गरज सांगून,कवी आहेत म्हणून समाज आणि असे मत व्यक्त केले. फ.म.शहाजिंदे यांनी कवी, तत्वज्ञ आहेत म्हणून समाज नाही तर समाज आणि म्हणून हे सर्व आहेत. समाजाकडून जे जे मिळते ते साहित्यरुपाने आपण समाजाला परत देण्याचे काम करतो,समाजाने साहित्यिकांना प्रोत्साहन द्यावेत,त्याशिवाय हे कसे लिहिणार असे विचार मांडले. ऍड. संभाजी पाटील म्हणाले की, समाजात परिवर्तन कसे होईल, यासाठी साहित्यिकांनी प्रयत्न करावेत, देशाची लोकशाही प्रबळ करायची असेल तर दिशा द्यावी अशी अपेक्षा व्यक्त केली. श्रीधर नांदेडकर यांनीही विचार मांडले.

या प्रसंगी प्रा. फ.म.शहाजिंदे यांची मराठवाडा साहित्य संमेलनाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल, ज्येष्ठ साहित्यिक यांच्या साहित्य चळवळीबद्दल तर अरुणा प्रकाशनचे राजकुमार बिरादार आणि वृत्तपत्र विक्रेते शिवराज खंडापूरे यांचा श्री अनंतपाळ साहित्यसेवा सन्मान देवून गौरव करण्यात आला.

याप्रसंगी योगेश आवाळे,गिरीष आवाळे आणि आवाळे परिवाराच्यावतीने श्री अनंतपाळ नवयुवक ग्रंथालयास ५१ हजार रुपयांची देणगि देण्यात आली.प्रारंभी सर्व मान्यवरांचा यथोचित सत्कार करण्यात आला.प्रभाकरराव कुलकर्णी यांच्यावरील डॉ.मन्मथ भातांब्रे लिखित ग्रंथ तसेच तुफानातील दिवे आणि शिक्षक पतसंस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले.

या सत्राचे प्रास्ताविक स्वागताध्यक्ष लक्ष्मण आवाळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.डी.के.धुमाळे यांनी केले. इंजि.किरण कोरे यांनी आभार मानले. तत्पूर्वी विविध शाळांतील विद्यार्थी, शिक्षक, भजनी मंडळ, साहित्यप्रेमींच्या सहभागाने ग्रंथदिंडी करण्यात आली. त्याचे उद्घाटन उपनगराध्यक्ष अनंत काळे यांच्या उपस्थितीत,नगराध्यक्षा चंद्रकला शिवणे यांनी केले, ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन बालाजी येरोळे यांच्या हस्ते झाले. तर प्रभाकरराव कुलकर्णी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.या संमेलनाला साहित्य रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदरील दोन दिवशीय साहित्य संमेलनासाठी श्री अनंतपाळ नवयुवक वाचनालयाचे नामदेव जगताप, विरभद्र भातांब्रे, त्र्यंबकअप्पा आवाळे, श्रीनिवास कुलकर्णी, डॉ.मन्मथ भातांब्रेख काशिनाथ देवंग्रे, उपाध्यक्षा सुनीता देवशटवार, उपसचिव पद्मा यरमलवार, कोषाध्यक्ष सुरेश कोटलवार, सत्यनारायण बंग, शिवाजीराव एरंडे, उमाकांत शिंदाळकर, महेमुद तांबोळी, उज्वला दुरुगकर, उज्ज्वला लादे, वकील नंदा, ललिता शिवणे, लता शेरसांडे, ब्रम्हेचा किरण, बसवराज पुजारी, वैशाली कारेगावकर, सरोजा राजपूत, ग्रंथपाल ग्रंथमित्र काशिनाथ बोडके, सहाय्यक ग्रंथपाल शिवनंदा शिवणे, लिपिक अनंत सूर्यवंशी, गोविंद हंद्राळे, रामाभाऊ कोळगे, गुणवंत भातांब्रे, किरण कोरे, राजेंद्र कुरे आदी परिश्रम घेत आहेत.

# रेणापूर कृऊबा संचालक अशोक राठोड यांचा भाजपात प्रवेश

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २७ डिसेंबर :** रेणापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक कॉंग्रेस कार्यकर्ते अशोक रामराव राठोड यांनी भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्र्वास ठेवून शनिवारी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.

लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात शनिवारी सकाळी रेणापूर तालुक्यातील मौजे फरदपूर येथील बंजारा समाजातील कॉंग्रेसचे कार्यकर्ते रेणापूर बाजार समितीचे संचालक अशोक रामराव राठोड यांनी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी माजी आमदार ॲड. त्र्यंबकनाना भिसे, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ भोसले, माजी सभापती अनिल भिसे, भाजपाचे मंडल अध्यक्ष शरद दरेकर, सुरज शिंदे, प्रताप पाटील, चव्हाण, प्रवीण कोतवाल, संजय ठाकूर, नारायण राठोड, गणेश चव्हाण, उत्तम




फरदपूरचे सरपंच बालाजी राठोड, गरसुळीचे सरपंच अजय राठोड, माजी सभापती विजय चव्हाण, श्रीमंत नागरगोजे, सुभाष राठोड, प्रकाश राठोड, राजसंघ राठोड यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

रेणापूर तालुक्यासह संपूर्ण लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी शासनाच्या विविध योजनेच्या माध्यमातून गावागावात वाडी वस्तीत मोठ्या प्रमाणात निधी मंजूर करून विकास कामांना गती दिली. सर्वत्र होत असलेल्या विकास कामांना प्रेरित होऊन मतदार संघातील अनेकजण आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टीत प्रवेश करत आहेत.

येणाऱ्या काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत लातूर ग्रामीण मतदारसंघात शतप्रतिशत भाजपा करण्यासाठी भाजपाचे कार्यकर्ते प्रयत्नशील आहे.

# आज आवर्तन मासिक संगीत सभेमध्ये सायली टाकचे गायन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, दि. २७ डिसेंबर :** येथील आवर्तन व अष्टविनायक प्रतिष्ठानच्या वतीने घेण्यात येणाऱ्या १३१ व्या आवर्तन मासिक संगीत सभेमध्ये लातूर येथील युवा संगीत साधक सायली टाक यांचे गायन होणार आहे.

अभिजात शास्त्रीय संगीताच्या प्रचार व प्रसारासाठी मागील १३० महिन्यांपासून लातूरमध्ये आवर्तन मासिक संगीत सभेचे आयोजन केले जाते, या मासिक संगीत सभेमध्ये आजपर्यंत भारतातील अनेक दिग्गज कलावंतांनी आपले गायन वादन तसेच नृत्य सादर केले आहे.

आज रविवार दि. २८ डिसेंबर २०२५ रोजी होणारी आवर्तन मासिक संगीत सभा लातूर येथील कै.सौ. कुमोदिनी विजयराव कुलकर्णी व कै. विजय दत्तात्रयराव कुलकर्णी यांच्या स्मृती प्रित्यर्थ लातूर येथील प्रसिद्ध फर्निचर वर्ल्ड चे प्रोप्रायटर श्री मनोज कुलकर्णी व त्यांच्या परिवाराने आयोजित केली आहे, आज होणाऱ्या या १३१ व्या मासिक संगीत सभेमध्ये लातूर येथील युवा गायिका कुमारी सायली सुनील टाक यांचे गायन संपन्न होणार आहे. व यांना तबला साथ लातूर येथील युवा तबला वादक चिरंजीव समिहन हरिसर्वोतम जोशी व संवादिनी साथ प्रा.शशिकांत देशमुख हे करणार आहेत. ही संगीत सभा आज सायं ६:३० वाजता, गणेश हॉल अष्टविनायक मंदिर लातूर या ठिकाणी होणार आहे. तरी या कार्यक्रमासाठी सर्व रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन आवर्तन प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभय शहा सचिव डॉक्टर रविराज पोरे, विशाल जाधव, फर्निचर वर्ल्ड चे मनोज कुलकर्णी व समस्त कुलकर्णी परिवाराच्या व आवर्तन प्रतिष्ठानच्या वतीने केले आहे.

## धरती माता बचाव निगरणी समितीची स्थापना

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २५ डिसेंबर :** जिल्ह्यामध्ये केंद्र सरकार व कृषि आयुक्तालय यांच्या सूचनेनुसार जिल्हाधिकारी वर्षा ठाकुर- घुगे यांच्या अध्यक्षतेखाली धरती माता बचाव अभियान अंतर्गत जिल्हास्तरीय धरती माता बचाव निगरणी समितीची स्थापना करण्यात आली आहे.

या समितीच्या बैठकीमध्ये रसायनिक खतांच्या अतिरिक्त वापर आणि बिगर कृषि कारणासाठी होणाऱ्या रसायनिक खत वापरावर लक्ष ठेण्याकरिता ग्रामस्तरावरील ग्राम कृषि विकास तथा धरती माता बचाव निगरणी समितीमार्फत गाव पातळीवर कळविण्यात आले आहे. तसेच तालुका अथवा उपविभागस्तरावर धरती माता बचाव निगरणी समिती स्थापन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जिल्ह्यामध्ये धरती माता बचाव अभियान अंतर्गत बागायत क्षेत्र व खताचा जास्तीचा वापर असणाऱ्या ग्रामपंचायतस्तरावर १०० गावांची निवड करावी. सदर निवडलेल्या गावांमध्ये ग्रामपंचायतीमार्फत ग्राम कृषि विकास समिती बैठक घेऊन रासायनिक खताचा वापर कमी करणे, बिगर कृषि कामासाठी खतांचा वापर होवू नये, यासाठी कृषि विज्ञान केंद्र शास्त्रज्ञ व समिति सदस्यद्वारे गावपातळीवर प्रचार व प्रसिद्धी करणे असा प्रकार होत असल्यास तो वेळीच तालुका व जिल्हापातळीवरील संबधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्याच्या सूचना दिल्या आहेत. यावेळी उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी भास्कर कोळेकर, डी. पी. जाधव, दीपक सुपेकर, डॉ. एस. एस. डिग्रसे, श्रीमती एम.यू बांगर उपस्थित होते.

## डॉ. पंजाबराव देशमुख शेतकऱ्यांचे कैवारी होते : डॉ. बिरादार

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २७ डिसेंबर :** भारत हा कृषीप्रधान अर्थव्यवस्थेचा देश आहे. डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शेती आणि शेतकऱ्यांना समृद्धदे करणारे धोरणे तयार करण्यासाठी आणि अंमलबजावणीसाठी त्यांनी आपली प्रतिभा ऊर्जा समर्पित केली त्यामुळे ते गरीब शेतकऱ्यांची बाजू मांडणारे शेतकऱ्यांचे कैवारी होते असे प्रतिपादन डॉ. गुणवंत बिरादार यांनी केले.

महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयात जयंती उत्सव समिती आणि कार्यालयाच्यावतीने डॉ. पंजाबराव देशमुख यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रोफेसर डॉ. आनंद शेवाळे हे होते तर कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. नितीन वाणी, डॉ. दिनेश मौने, डॉ. यशवंत वळवी, डॉ. संजय गवई, डॉ. सदाशिव दंदे, डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. विनायक वाघमारे, डॉ. दीपक चाटे, प्रा. माधव नायणे, प्रा. केशव सूर्यवंशी, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदर्गे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेला प्रभारी प्राचार्य प्रोफेसर डॉ. आनंद शेवाळे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. अध्यक्षीय समारोप प्रोफेसर डॉ. आनंद शेवाळे यांनी केला. सूत्रसंचालन नामदेव बेंदरगे यांनी केले तर आभार डॉ. संजय गवई यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अजय गायकवाड, शिवशंकर खुब्बा आणि गुरुप्रसाद बिरादार यांनी परिश्रम घेतले.

# तथागत बुद्धांचा विचार मानवतेचा विचार : भिक्खु महाथेरो

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २७ डिसेंबर :** तथागत बुद्धाने सर्व मानव जाती करीता आपल्या नितिमान धम्माची शिकवण दिली आहे. सर्व जीव प्राण्यांचे कल्याण व्हावे यासाठी करुणा, मैत्री आणि अहिंसा या उच्च तत्वाचा उपदेश केला आहे. भवतु सब्ब मंगल आणि बहुजन हिताय सुखाय हा विश्र्व कल्यानाचा मार्ग बुद्धाने सर्वप्रथम सांगितलेला आहे त्यामुळे तथागत बुध्दाचा विचार हा मानवतेच्या हिताचा विचार असल्याचे प्रतिपादन अ. भा. भिक्खु संघांचे संघनायक पू. भिक्खु करुणानंद महाथेरो (दिल्ली) यांनी केले आहे.

बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्ट व समस्त बौध्द उपासक-उपासिकांच्यावतीने डॉ. भिक्खु उपगुप्त महाथेरो यांच्या मार्गदर्शनाखाली व भिक्खु पय्यानंद थेरो यांच्या संयोजनाद्वारे महाविहार, धम्म संस्कार केंद्र, बार्शी रोड, सातकर्णी नगर,





रामेगाव ता. जि. लातूर येथे एक दिवशीय आठवी अ. भा. बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. धम्म परिषदेच्या सकाळच्या पहिल्या सत्रात आंबेडकर चौक आणि बौध्द नगर येथून पंचरंगी ध्वजारोहण करून महापुरुषांच्या मुर्तीसह भिक्खु संघ आणि बौध्द उपासक-उपासिका यांची भव्य धम्म मिरवणूक काढण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क, लातूर येथे मिरवणुकीचे समापन झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकास सर्व कार्यकर्ते यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. भिक्खु पय्याबोधी थेरो यांच्या हस्ते ध्वजारोहन करून त्रिशरण पंचशिल वंदना घेण्यात आली.

धम्म परिषदेच्या दुपारच्या दुसऱ्या उदघाट्कीय सत्रात अ. भा. भिक्खु संघांचे संघनायक भिक्खु करुणानंद महाथेरो (दिल्ली) यांच्या हस्ते पूज्य भिक्खु संघ, प्रमुख अतिथी यांच्या उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले. यावेळी हजारोच्या संख्येने बौध्द जनसमुदाय उपस्थित होता. प्रारंभी सामूहिक बुद्ध वदंना करून भिक्खु संघांचे व मान्यवरांचे स्वागत केले गेले. यावेळी 'सातकर्णी' स्मरणिके सहीत आर्या मेत्ता, डॉ. मा. ना. गायकवाड यांच्याही ग्रंथाचे प्रकाशन सर्वांच्या हस्ते करण्यात आले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### भरधाव कारची सुरक्षा कठड्याला धडक




**कन्नड :** सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावर अंबाडी मध्यम प्रकल्पाजवळील गोपालवाडी परिसरात भरधाव चारचाकी कारने रस्त्याच्या कडेला असलेल्या सुरक्षा कठड्याला धडक दिल्याची घटना दि. २७ डिसेंबर रोजी पहाटे सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास घडली. के.एल. ४५ टी १५३८ या क्रमांकाची कार चाळीसगावच्या दिशेने जात असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने रस्त्याच्या बाजूला असलेल्या सुरक्षा कठड्याला कार धडकली. या अपघातात कारचे नुकसान झाले असून सुदैवाने कोणालाही इजा झाली नाही. घटनेनंतर काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला होता. संबंधित यंत्रणांकडून परिस्थिती नियंत्रणात आणण्यात आली.

### हायपरसर्व्हिस सेंटर्स लाँच

**नाशिक :** पात्र ग्राहकांना कोणत्याही अतिरिक्त खर्चाशिवाय त्याच दिवशी सेवा हमी देण्यासाठी डिझाइन केलेले समर्पित हायपरसर्व्हिस सेंटर्स लाँच करून ओलाने आज त्यांच्या हायपरसर्व्हिस उपक्रमाचा विस्तार करण्याची घोषणा केली. या विस्ताराचा एक भाग म्हणून, ओला त्यांच्या विद्यमान सेवा केंद्रांना हळूहळू हायपरसर्व्हिस सेंटर्समध्ये अपग्रेड करेल, ज्याची सुरुवात बेंगळुरूपासून होईल. पहिले हायपरसर्व्हिस सेंटर आता बेंगळुरूच्या इंदिरानगरमध्ये कार्यरत आहे. हायपरसर्व्हिस सेंटरची रचना सेवा अनुभव मूलभूतपणे सुलभ आणि वेगवान करण्यासाठी केली गेली आहे. ग्राहक आता त्यांच्या वाहनांची सेवा एकाच दिवसात करू शकतात, कोणतेही अतिरिक्त पैसे न देता, आणि शेवटी-ते-शेवटी पूर्णपणे डिजिटल आणि पारदर्शक सेवा प्रवास अनुभवू शकतात.

### जैवविविधता उद्यानाचे उद्घाटन

**छत्रपती संभाजीनगर :** वातावरणाचा विचार करता संवेदनशील असलेल्या महाराष्ट्रातील मराठवाडा विभागात स्थानिक जैवविविधता पुन्हा साध्य करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल टाकत, आगा खान एजन्सी फॉर हॅबिटॅट इंडियातर्फे छत्रपती संभाजीनगर येथे जैवविविधता उद्यान सुरू करण्यात आले आहे. हे जैवविविधता उद्यान खाम नदीच्या काठावर विकसित करण्यात आले असून, आगा खान एजन्सी फॉर हॅबिटॅट इंडियाच्या शहरी नदीकाठ पुनरुज्जीवन आणि पर्यावरणीय पुनर्स्थापन उपक्रमाचा हा एक भाग आहे. हा उपक्रम छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या सहकार्याने आणि प्रिन्स सादरुद्दीन आगा खान फंड फॉर द एन्व्हायर्नमेंट यांच्या सहाय्याने राबवण्यात आला आहे.

### खुशी यादवला वाचवण्यासाठी पालकांची मदतीची आवाहन

**मुंबई :** २१ महिन्यांच्या चिमुकली खुशी यादवच्या पालकांनी आपल्या मुलीचे प्राण वाचवण्यासाठी जनतेकडे तातडीची मदतीची विनंती केली आहे. खुशीला स्पायनल मस्क्युलर अॅट्रॉफी टाइप-२ हा दुर्मिळ आणि जीवघेणा आनुवंशिक आजार असल्याचे निदान झाले आहे. हा आजार हळूहळू स्नायू कमकुवत करतो आणि वेळेवर उपचार न झाल्यास अल्पावधीत जीवघेणा ठरू शकतो. फेब्रुवारी २०२४ मध्ये जन्मलेली खुशी - ज्याच्या नावाचा अर्थच आनंद असा होतो - आपल्या कुटुंबात प्रचंड आनंद घेऊन आली होती. मात्र आज ती अशा आजाराशी लढत आहे, ज्यामुळे तिला उभे राहणे किंवा चालणे शक्य राहिलेले नाही. तिच्या घोट्यांतील व गुडघ्यांतील रिफ्लेक्सेस नष्ट झाले आहेत, तिला स्वतःहून बसणे कठीण जाते आणि वारंवार दीर्घकालीन श्वसन संसर्ग होतो, ज्यासाठी नेब्युलायझेशन करावे लागते.

### पाटेगांव ते महेश चौक रोडवर अपघातात वाढ

**पैठण , दि.२७ डिसेंबर :** पैठणला जवळपास तीन जिल्ह्याना जोडणारा महेश चौक ते पाटेगांव या रस्त्यावर जागोजागी खड्डे,नादुरुस्त पूल, रस्तेकडीचे वाहून गेलेले साईड पंखे,दुतर्फा वाढलेल्या वेढ्या बाभळीमुळे रोडवर दररोज अपघात होत असून याप्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाने वेळीच लक्ष दिल्यास संभाव्य अपघात थांबण्यास मदत होणार आहे. महेश चौक, तहसील कॉर्नर, पेट्रोल पंप, महावीर चौक, शहागड फाटा,गोदावरी वरील नादुरुस्त पूल, पाटेगांव चढावर खड्डे, साईड पंखे वाहून गेल्याने उसाचे वाहन थेट माणसांच्या अंगावर येत आहे. तसेच रस्त्याच्या दुतर्फा काट्यांचे कुंपणाने दररोज अपघात होत असल्याने वाहन धारक जीव मुठीत ठेवून या रस्तावर प्रवास करत आहेत. काही दिवसांपूर्वी रोडवर चारचाकी व दुचाकी अपघातात पैठणचे माजी उपनगराध्यक्ष भाऊसाहेब पिसे व अन्य एकाचा जागेवरच मृत्यू झाला होता. तसेच पाटेगाव परिसरात वेगवेगळ्या अपघातात दोघांचा मृत्यू झाला होता.

# 'एमआयएम'मध्ये उमेदवारीवरून भरचौकात मारहाण

## छत्रपती संभाजीनगरात एमआयएमची धुसफूस चव्हाट्यावर



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर , दि.२७ डिसेंबर :** महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख जवळ येत असतानाच एमआयएम पक्षातील अंतर्गत वाद उघडपणे समोर आला आहे. प्रभाग क्रमांक १२ मधील उमेदवारीवरून दोन गट आमनेसामने आल्याने किराडपुरा चौक परिसरात भररस्त्यात तुंबळ हाणामारी झाल्याची घटना शुक्रवारी घडली.

एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांनी शुक्रवारी पक्षाच्या चार अधिकृत उमेदवारांची यादी जाहीर केली. त्यामध्ये प्रभाग क्रमांक १२ मधून सर्वसाधारण गटासाठी मोहम्मद असरार यांना उमेदवारी देण्यात आली. मात्र, याच प्रभागातून माजी नगरसेवक इसाक हाजी यांनीही उमेदवारीसाठी अर्ज दाखल केला होता. मागील निवडणुकीत इसाक हाजी यांच्या मातोश्री एमआयएमकडून निवडून आल्या होत्या.

असरार यांची उमेदवारी जाहीर होताच त्यांच्या समर्थकांनी रोशन गेट येथून जल्लोषात रॅली काढली. रॅली किराडपुरा चौकात पोहोचताच फटाके फोडण्यात आले. याच वेळी इसाक हाजी आणि मोहम्मद असरार यांच्या समर्थकांमध्ये शाब्दिक वाद झाला. काही वेळातच हा वाद हाणामारीत रूपांतरित झाला. या घटनेत इसाक हाजी गटातील दोन कार्यकर्ते जखमी झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून जिन्सी पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान, असरार गटाविरोधात जिन्सी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्याची माहिती इसाक हाजी यांनी दिली.

यानंतर एमआयएमचे प्रदेश सचिव समीर साजीद है जिन्सी पोलीस ठाण्यात इसाक हाजी यांची भेट घेण्यासाठी आले असता, नाराज कार्यकर्त्यांनी त्यांना घेराव घातला. दोन्ही बाजूंशी चर्चा करून हा वाद तात्पुरता मिटवण्यात आल्याचा दावा पक्षाच्या वतीने करण्यात आला आहे. महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घडलेल्या या घटनेमुळे एमआयएममधील अंतर्गत कलह ऐन प्रचाराच्या तोंडावर चव्हाट्यावर आला आहे.

## आचार्य गुप्तीनंदी, आचार्य गुणधरनंदी गुरुदेवांचा मिलन सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर , दि.२७ डिसेंबर :** शहरापासून जवळच असलेल्या कचनेर येथील धर्मतीर्थ क्षेत्रावर राष्ट्रसंत आचार्य गुप्तीनंदी गुरुदेव आणि नवग्रह सुमेरूतीर्थ प्रणेता आचार्य गुणधरनंदी गुरुदेव यांचा भव्य 'गुरुभाई मिलन सोहळा' हजारो भाविकांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला. यावेळी धर्मतीर्थ क्षेत्राच्या वतीने आचार्य गुणधरनंदी महाराज यांना 'धर्मक्रांती सूर्य' ही उपाधी देऊन गौरविण्यात आले.



या सोहळ्यानिमित्त भव्य शोभायात्रा काढण्यात आली होती. मंचावर दोन्ही आचार्यांची गळाभेट होताच उपस्थित भाविक आनंदाने भारावून गेले. कार्यक्रमाचे मंगलाचरण आर्यिका आस्थाश्री माताजी यांनी केले. यावेळी बोलताना आचार्यश्रींनी, धर्मतीर्थ क्षेत्र हे कालांतराने एक महान तीर्थक्षेत्र बनेल, असा आशीर्वाद दिला.

याप्रसंगी बडजाते परिवार (नांदरवाला, अहिल्यानगर) व ठोलिया परिवार (जयपूर) यांच्यातर्फे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात संजयकुमार पापडीवाल परिवारातर्फे

### आचार्य गुणधरनंदी महाराजांना 'धर्मक्रांती सूर्य' उपाधीने सन्मान

पादपक्षालन, विजयकुमार पाटणी परिवारातर्फे पिच्छी अर्पण, राखी लोहाडे यांच्यातर्फे कमंडलु, तर अशोक डोसी यांच्यातर्फे शास्त्र अर्पण करण्यात आले. क्षेत्राचे अध्यक्ष चंद्रशेखर पाटणी, संजय पापडीवाल, पवन पापडीवाल, राजेंद्र पाटणी, सतीश लोहाडे, गुलाबचंद कासलीवाल यांच्यासह अनेक मान्यवरांनी भगवंतासमोर पुष्प अर्पण केले. कार्यक्रमासाठी मोफत वाहन व्यवस्था पारस पांडे यांनी केली. अशी माहिती प्रचार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी दिली.

## गंगापूर तालुक्यातील ५८ गावे वाळूज महानगर न्यायालयात जोडण्यास विरोध

**तभा वृत्तसेवा**

**गंगापूर, दि.२७ डिसेंबर :** वाळूज महानगर, जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथे दिवाणी व फौजदारी न्यायालय स्थापन करण्यास माननीय उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक १५ जानेवारी २०२१ रोजी तात्विक मान्यता दिली आहे. या पार्श्वभूमीवर दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी गंगापूर तहसीलदार कार्यालयाने गंगापूर तालुक्यातील एकूण ५८ गावांची यादी जिल्हा न्यायालयाकडे पाठवली आहे.

या ५८ गावांपैकी ४० गावे वाळूज पोलीस ठाणे हद्दीत तर १८ गावे एमआयडीसी पोलीस ठाणे, वाळूज हद्दीत येतात. ही सर्व गावे प्रस्तावित वाळूज महानगर न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात जोडण्याच्या हालचाली सध्या सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र गंगापूर तालुक्यातील ही सर्व ५८ गावे वाळूज महानगर न्यायालयात समाविष्ट केल्यास तालुक्यातील नागरिकांची मोठी गैरसोय होणार असल्याची तीव्र प्रतिक्रिया नागरिक, वकील व सामाजिक संघटनांकडून व्यक्त होत आहे.

गंगापूर हे तालुक्याचे मुख्यालय असून येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, वरिष्ठ स्तरावरील दिवाणी न्यायालय कार्यरत आहे. याशिवाय तहसील कार्यालय, दुय्यम निबंधक (रजिस्टर) कार्यालय, भूमी अभिलेख कार्यालय, कृषी विभाग, पंचायत समिती तसेच इतर महत्त्वाची शासकीय कार्यालये गंगापूर येथे आहेत. उपविभागीय अधिकारी कार्यालय वैजापूर येथे असून महसूल प्रकरणांच्या सुनावणीसाठी उपजिल्हाधिकारी दर बुधवारी व गुरुवारी गंगापूर तहसील कार्यालयात उपस्थित राहतात.

> न्यायालयीन व महसूल यंत्रणा एकाच ठिकाणी असणे गरजेचे आहे. अन्यथा पक्षकारांना दोन ठिकाणी फेऱ्या माराव्या लागतील. हा निर्णय व्यवहार्य नाही, अशी प्रतिक्रिया वकील संघटनेने दिली.

अशा परिस्थितीत गंगापूर तालुक्यातील ५८ गावे वाळूज महानगर न्यायालयात जोडल्यास नागरिकांना फक्त न्यायालयीन कामासाठी वाळूज महानगर येथे जावे लागेल, तर शासकीय कामकाज, महसूल प्रकरणे व वरिष्ठ न्यायालयीन कामासाठी पुन्हा गंगापूर येथे यावे लागणार आहे. यामुळे पक्षकार, शेतकरी, महिला व ज्येष्ठ नागरिक यांचे आर्थिक नुकसान होऊन मानसिक त्रास सहन करावा लागेल, अशी भावना व्यक्त होत आहे.

न्यायसुविधा सुलभ करण्याऐवजी अधिक गुंतागुंतीच्या ठरतील, असा आरोप करत या निर्णयाला शहर व तालुक्यातून विरोध होत असून प्रशासनाने याबाबत फेरविचार करावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

गंगापूर हे तालुक्याचे केंद्र आहे. सर्व शासकीय कार्यालये येथे असताना न्यायालय वेगळ्या ठिकाणी हलवणे म्हणजे सामान्य माणसांची पिळवणूक आहे. हा निर्णय तात्काळ थांबवावा.

न्याय मिळवण्यासाठी जनतेची गैरसोय होणार असेल तर कोणताही निर्णय स्वीकारार्ह नाही. शासनाने व न्याय विभागाने जनभावना लक्षात घेऊन योग्य तो बदल करावा, अशी प्रतिक्रिया स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिली.

ग्रामीण भागातील लोकांना न्याय मिळवण्यासाठी आधीच संघर्ष करावा लागतो. वाळूज - गंगापूर अशी दुहेरी धावपळ केल्यास गरीब व गरजू नागरिकांवर अन्याय होईल.

## डब्ल्यूएमजी फाउंडेशन सोबत सामंजस्य करार

**बेंगळुरू :** टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज कर्नाटकातील बंडीपूर व्याघ्र प्रकल्पातील ऱ्हास झालेल्या वनपरिसराच्या पुनरुज्जीवनासाठी डब्ल्यूएमजी फाउंडेशनसोबत सामंजस्य करार (एमओयू) केला. या हस्तक्षेपाचा उद्देश आक्रमक लँटाना कॅमारा तण काढून टाकून मानव-वन्यजीव संघर्ष कमी करणे आणि पर्यावरणीय असमतोल दूर करणे हा आहे.

हा एमओयू टोयोटा किर्लोस्कर मोटरचे कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटीचे जनरल मॅनेजर रोशन आर. यांनी डब्ल्यूएमजी फाउंडेशनच्या प्रमुख सुश्री अपूर्वा अंगडी व्ही. एम. यांच्या उपस्थितीत औपचारिकरित्या अदलाबदल केला. बंडीपूर व्याघ्र प्रकल्पावर लँटाना कॅमारा या आक्रमक प्रजातीचा दीर्घकाळापासून परिणाम होत आहे.

## वासडी शाळेला आ. संजना जाधव यांची भेट

**तभा वृत्तसेवा**

**कन्नड, दि.२७ डिसेंबर :** कन्नड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नवीन वसाहत केंद्र वासडी येथे 'आमदार आपल्या भेटीला' या उपक्रमांतर्गत आमदार संजना जाधव यांनी दि.२६ रोजी भेट दिली. प्रशासकीय अधिकारी तथा कक्ष प्रमुख,अनिल घुगे, खरेदी-विक्री संघ संचालक ज्ञानेश्र्वर निकम, पंचायत समिती कन्नडचे गटशिक्षण अधिकारी सबाहत मोहम्मद, शिक्षण विस्तार अधिकारी मनीष दिवेकर व बाजीराव ताठे, तालुकाप्रमुख नारायण बोडखे, विनोद जाधव, प्रशांत निर्मळ, जयेश बोरसे आदी प्रमुख पाहुणे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात शाळेच्या मुख्याध्यापिका अपर्णा धाटबळे यांनी शाळेच्या विकाससंबंधी तसेच विविध अडचणींबाबत सविस्तर माहिती



दिली. शाळा स्तरावर करता येणाऱ्या सुधारणा, भौतिक सुविधा, शैक्षणिक गरजा याविषयी त्यांनी सखोल मांडणी केली.

यावेळी आमदार संजना जाधव यांनी शाळेच्या मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेत जिल्हा परिषद शाळांना प्राधान्य देत टप्प्याटप्प्याने समस्या सोडवण्याचे आश्र्वासन दिले. लवकरच शाळेच्या विकासासाठी ठोस कार्यवाही करून शाळेचा कायापालट करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमानंतर त्यांनी शाळेचा परिसर, वर्गखोल्या व इमारतींची पाहणी केली आणि भौतिक सुविधा सुधारण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

या प्रसंगी ग्रामपंचायत खातखेडा-साखरवेलचे सरपंच, उपसरपंच व सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती नवीन वसाहत व खातखेडा येथील पदाधिकारी व सदस्य, शिक्षकवृंद, माता-पालक गट, अंगणवाडी सेविका, वैद्यकीय अधिकारी, आशा कार्यकर्त्या, शाळा कृती समितीचे सदस्य तसेच ग्रामस्थ व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापिका अपर्णा धाटबळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन अतुल बागुल यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अपर्णा धाटबळे, किरण सोमदे, अण्णा बनकर, भैय्यासाहेब घाटगे तसेच शाळा व्यवस्थापन समिती व शिक्षकांची उपस्थिती होती.

## दंगलखोर असल्याचे आरोप रशीद मामूंनी फेटाळले

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर , दि.२७ डिसेंबर :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटात प्रवेश केलेले सामाजिक कार्यकर्ते रशीद खान मामू यांनी त्यांच्या वर करण्यात आलेले आरोप ठाम शब्दांत फेटाळले आहेत. रशीद खान मामू यांनी पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका स्पष्ट केली.

रशीद मामू म्हणाले की, गेल्या पाच दशकांपासून ते सामाजिक आणि सार्वजनिक जीवनात सक्रिय असून त्यांच्या कार्यकाळात त्यांनी कधीही धार्मिक तेढ निर्माण करणारी भूमिका घेतलेली नाही. १९८० आणि १९८६ च्या दंगलींच्या काळात अनेक हिंदू कुटुंबांचे प्राण वाचवले असून त्याचे साक्षीदार आजही शहरात आहेत, असा दावा त्यांनी केला. माझ्यावर दंगलखोर किंवा समाजात फूट पाडणारा असा एकही न्यायालयीन निकाल नाही. उलट मला पोलिसांकडून चारित्र्य प्रमाणपत्र मिळाले असून शासनाने मला सन्मानासाठी नामांकन दिले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. हिंदू-मुस्लिम भेदभावाच्या आरोपांवर प्रतिक्रिया देताना त्यांनी सांगितले की, शहरातील सर्व समाजघटकांशी सलोख्याचे संबंध असून आजही विविध धर्मातील नागरिक त्यांच्यासोबत उभे आहेत. शिवसेना उबाठा गटात प्रवेश हा वैचारिक भूमिकेतून असून कोणत्याही दबावाखाली केलेला नाही, असे त्यांनी ठामपणे नमूद केले. आरोप करण्याऐवजी ठोस पुरावे सादर करावेत, असे आव्हानही त्यांनी दिले.

## विश्व हिंदू परिषदेतर्फे शास्त्रशुद्ध पूजा प्रशिक्षण कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २६ :** बजाजनगर येथील श्री साईबाबा मंदिरात विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित आयामतर्फे गुरुवार, दि. २५ डिसेंबर २०२५ रोजी शास्त्रशुद्ध पूजा प्रशिक्षण कार्यशाळा यशस्वीरीत्या संपन्न झाली. या कार्यशाळेत वेदमूर्ती रमाकांत देव गुरुजी यांनी धर्मपालन, संस्कृती संवर्धन आणि वैदिक परंपरेचे महत्त्व विशद केले.

देहाकडून देवाकडे जाताना देश महत्त्वाचा असल्याने प्रत्येकाने आपल्या संसार व व्यवसायासोबत राष्ट्र आणि धर्मासाठी योगदान द्यावे, असे त्यांनी सांगितले. माणूस कोणत्या जातीत जन्माला आला यापेक्षा तो कोणत्या मातीत




जन्माला आला हे अधिक महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन करत वैदिक हिंदू धर्माचे जागतिक स्तरावरील महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. धर्मो रक्षति रक्षितः या उक्तीचा संदर्भ देत धर्मरक्षणाची जबाबदारी प्रत्येकावर असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यशाळेत पंचोपचार, दशोपचार व षोडशोपचार पूजाविधी, देवघराची योग्य मांडणी, दिव्यांची रचना व नित्यपूजेतील शास्त्रीय बाबींचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून उद्योजक प्रतापराव थोरात, मंदिर अर्चक पुरोहित आयाम प्रांत संपर्कप्रमुख राजीव जहागीरदार, आरएसएस वाळूज जिल्हा संघचालक अनिल पाटील व पालक दामोदर घुगे उपस्थित होते. सुरुवातीस दीपप्रज्वलन झाले. प्रास्ताविक राजीव जहागीरदार यांनी केले, सूत्रसंचालन संजीव तायडे यांनी तर आभार ओमप्रकाश कसानिया यांनी मानले.

कार्यक्रमासाठी देविदास पवार, ज्ञानेश्वर लबडे, प्रवीण देशमुख, दौलत फोडदे, कविता जगदाळे व प्रियांका घोरपडे यांनी परिश्रम घेतले. शेवटी सामूहिक आरतीने कार्यक्रमाची सांगता झाली.

### सामुहिक व्दादसी महाप्रसादाने भक्ती व मनाचे पावित्र्य वाढते : ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड



**जालना :** व्दादशी महाप्रसादाच्या निमित्ताने भाविक एकत्र आल्याने सामुहीक भक्तीबरोबर वैचारीक देवाण घेवाण व भेटीगाठीमुळे मनाचे पाविञ्य वाढते. तसेच आपसांत आपुलकी वाढते. महाप्रसाद सेवेकऱ्याच्या घरी या निमित्ताने भजन, नामस्मरण होते. अशाने तणाव मुक्तीस मदत होते. त्यामुळे व्दादशी महाप्रसादाचे सामुहीक कार्यक्रम व्हायला हवेत, असे प्रतिपादन ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड यांनी केले. याप्रसंगी श्रीमदभगवद्गीतेच्या पंधराव्या अध्यायाचे सामुहिक पठण करण्यात आले. तसेच श्री ज्ञानेश्वर महाराजांचा हरिपाठ घेण्यात आला. यावेळी प्रा. रवी शेळके, नामदेव येवले, भगवान थीटे दाजी, त्रिभुवन माऊली, विष्णू राजगुडे महाराज, दिगंबर म्हस्के, प्रा. डॉ. आनंद सोनवणे, डॉ. श्रीकांत खुपसे, प्रथमेश चाटे, सुलोचना शेळके, प्रा. डॉ. अश्वीनी शेळके, अॅड. अजयकुमार फड, श्रीमती मनिषाताई जयवाळ आदींनी पुढाकार घेतला होता.

### सिताराम पाटील यांचे निधन



**सोयगाव :** तालुक्यातील पिप्री (माळेगांव) येथील सिताराम नारायण पाटील (वय.१००) यांचे वृद्धापकाळाने दि.२७ शनिवार रोजी सकाळी १०:०५ वाजता निधन झाले.त्यांचेवर संध्याकाळी ५:०० वा.पिप्री माळेगांव येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सोयगांव येथील बाळू बोरसे यांचे ते आते मामा होत.

## अग्रलेख...

# देशाच्या दीपस्तंभांचे स्मारक...

दिवंगत पंतप्रधान, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या १०१ व्या जयंतीनिमित्त उत्तरप्रदेशची राजधानी लखनौ येथे राष्ट्र प्रेरणास्थळाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. या प्रेरणास्थळात अटलबिहारी वाजपेयी यांच्यासह जनसंघाचे संस्थापकद्वय डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी आणि पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या ६५ फूट उंचीच्या भव्य अशा प्रतिमा आहेत. राष्ट्रीय सन्मान वाढवणारे स्मारक म्हणून याचा उल्लेख करावा लागेल, ज्याची आज खरोखर देशाला आवश्यकता होती. ज्यांच्यासमोर श्रद्धेने, आदराने झुकावे, नतमस्तक व्हावे, चरणस्पर्श करावा वा ज्यांच्यासमोर साष्टांग दंडवत घालावा, अशी व्यक्तिमत्त्वे आपल्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय जीवनातून हळूहळू कमी होत आहेत. त्या पृष्ठभूमीवर या राष्ट्र प्रेरणास्थळाचे निर्माण आणि लोकार्पण उल्लेखनीय म्हणावे लागेल. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी आणि पंडित दीनदयाल उपाध्याय यांचे पुतळे आपल्या देशात फार कमी असतील. राष्ट्रउभारणीत अनन्यसाधारण योगदान देणाऱ्या या दोन नेत्यांची, ते बहुधा जनसंघाचे आणि पर्यायाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे असल्यामुळे, सर्वार्थाने उपेक्षा झाली. आपल्या देशात सर्वाधिक पुतळे हे राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आहेत. देशाच्या दुर्गम भागातील कोणत्याही छोट्या मोठ्या गावात आपण गेलो तर या दोन्ही महापुरुषांचे पुतळे आपल्याला जागोजागी दिसतात. आपल्या देशाच्या सामाजिक आणि राजकीय जीवनात या दोन्ही महापुरुषांचे योगदान कोणी नाकारणार नाही. त्यामुळे आपल्यासमोर आदर्श म्हणून त्यांचे पुतळे उभारण्यात गैर काही नाही. त्यानंतर आपल्याला पुतळे दिसतात ते नेहरू आणि गांधी घराण्यातील नेत्यांचे. पंडित जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांचे पुतळेही देशाच्या अनेक भागांत आहेत. त्या तुलनेत जनसंघाच्या वा नंतरच्या भाजपाच्या नेत्यांचे पुतळे देशात दिसत नाहीत. पुतळे हा एकमेव निकष धरला तर जनसंघ आणि भाजपाच्या नेत्यांचे देशाच्या उभारणीत कोणतेही योगदान नव्हते का, असा प्रश्न कोणालाही पडू शकतो. पंडित नेहरूनंतर त्यांच्या कन्या इंदिरा गांधी देशाच्या पंतप्रधान झाल्या आणि त्यानंतर त्यांचे पुत्र राजीव गांधी यांना देशाचे पंतप्रधानपद भूषवण्याची संधी मिळाली. ही घराणेशाहीच होती. इतरांना वावच नव्हता. घराणेशाहीचा शाप आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लागला. मोतीलाल नेहरू काँग्रेस नेते होते. त्यानंतर काँग्रेसचे नेतृत्व जवाहरलाल नेहरू यांच्याकडे आले. नेहरू-गांधी कुटुंबाच्या या घराणेशाहीमुळे देशाचेच नाही तर काँग्रेस पक्षाचेही अपरिमित नुकसान झाले. ते आजही थांबलेले नाही.

राजीव गांधी यांच्यानंतर काँग्रेसचे नेतृत्व सोनिया गांधी यांच्याकडे आले. आता त्यांचे चिरंजीव राहुल गांधी यांच्याकडे काँग्रेसचे नेतृत्व आहे. राहुल गांधी यांनी आपल्या नेतृत्वाच्या काळात काँग्रेसची किती आणि कशी वाट लावली, हे देश रोज अनुभवत आहे. राष्ट्रीय प्रेरणास्थळाचे लोकार्पण करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या घराणेशाहीवर आणि काँग्रेसच्या तुष्टीकरणाच्या धोरणावर हल्ला चढवला. गेली अनेक दशके देशाची सत्ता एकाच कुटुंबाच्या हातात एकवटली होती. या कुटुंबाने संपूर्ण देशाला ओलिस धरले होते, असे जे मोदी यांनी म्हटले, ती फक्त त्यांची भावना नव्हती, तर संपूर्ण देशाच्या मनातील भावना त्यांनी व्यक्त केली असे म्हणावे लागेल. एका विशिष्ट धर्माच्या लोकांच्या तुष्टीकरणासाठी सेक्युलॅरिझम या शब्दाचा चुकीचा अर्थ लावत भलत्याच गोष्टींचा उदोउदो करण्यात आला. सेक्युलॅरिझम म्हणजे धर्मनिरपेक्षता असे लोकांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न झाला. कोणताही भेदभाव न करता सर्वांचा सारखा विकास म्हणजे सेक्युलॅरिझम असे मोदी यांनी यावेळी सेक्युलॅरिझमची नव्याने व्याख्या करताना सांगितले. काँग्रेसच्या शासनकाळात गठ्ठा मतांच्या राजकारणासाठी अल्पसंख्यक मुस्लिमांचे तुष्टीकरण करण्यात आले. नाहक लाड करत त्यांना डोक्यावर बसवण्यात आले, तर बहुसंख्यक असलेल्या हिंदूंची उपेक्षा करण्यात आली, त्यांना पायदळी तुडवण्यात आले. काही दिवसांपूर्वी राजधानी दिल्लीत पुस्तक प्रकाशनाच्या एका कार्यक्रमात बोलताना, केंद्रीय भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी सेक्युलॅरिझम म्हणजे धर्मनिरपेक्षता नाही तर सर्वधर्मसमभाव, असा नेमका अर्थ सांगितला होता. सर्वधर्मसमभाव म्हणजे सर्व धर्मांच्या लोकांना सारखी वागणूक देणे, धर्माच्या आधारावर त्यांच्यात भेदभाव न करणे. पण काँग्रेसने आपल्या शासनकाळात नेमके हेच केले, राजकीय स्वार्थासाठी मुस्लिमांचे तुष्टीकरण करत हिंदूंना डावलले. धर्मनिरपेक्षता म्हणजे आम्ही कोणत्याच धर्माला मानत नाही, असा अर्थ काढता येऊ शकतो. जगातील कोणत्याही देशाची ओळख ही त्याच्या धर्माच्या आधारावर होत असते. त्यामुळे धर्माचे महत्त्व आपण नाकारू शकत नाही. मुस्लिमांचे तुष्टीकरण करताना काँग्रेसने त्या धर्माच्या लोकांचा सर्वांगीण विकास केला असेही नाही. तर आपल्या राजकीय स्वार्थासाठी त्या लोकांचा फक्त वापर करून घेतला. आपली राजकीय उद्देशपूर्ती झाल्यावर त्या समाजाला वाऱ्यावरही सोडले. काँग्रेसने केलेल्या तुष्टीकरणातून मुस्लिम धर्मातील लोकांचा फायदा झाला, असे नाही. उलट या धर्मातील लोकांचे नुकसानच झाले. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय अशा सर्व आघाड्यांवर या धर्मातील लोक अजूनही मागासलेलेच आहेत. यातून देशात हिंदू आणि मुस्लिम अशी कायमस्वरूपी उभी फूट पडली. त्याचा फटका मुस्लिम धर्मातील लोकांनाच बसला. गरीब अधिक गरीब झाला, तर श्रीमंत अधिक श्रीमंत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या विसंगतीकडेच या कार्यक्रमातून लक्ष वेधले. काँग्रेसच्या या भूमिकेमुळे देशातील दलित, शोषित, पीडित, वंचित वर्ग आणखी गरीब झाला, दोनवेळचे पोटभर जेवण करणेही त्याला अशक्य झाले. अर्धपोटी जगण्याची वेळ त्याच्यावर आली. या लोकांच्या सर्वांगीण कल्याणाचा शाश्वत मार्ग पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी आपल्या अंत्योदय या विचारातून दाखवला. समाजातील शेवटच्या माणसाचे कल्याण म्हणजे अंत्योदय. मोदी सरकारची गेल्या अकरा वर्षांतील वाटचाल अंत्योदयाच्या धोरणानुसार चालू आहे. गेल्या अकरा वर्षांच्या कार्यकाळातील मोदी सरकारच्या कल्याणकारी योजनांचा आढावा घेतला तर याची खात्री पटते. लखनौच्या राष्ट्र प्रेरणास्थळातील पंडित दीनदयाल उपाध्याय यांचा पुतळा त्यांच्या अंत्योदयाच्या धोरणाची जाणीव करून देण्यासाठी उभारण्यात आला आहे, असे म्हणायला हरकत नाही.

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे घटनेतील ३७० कलम रद्द करण्यासाठी सर्वतोपरी आवाज उठवला. 'एक देश में दोन विधान, दोन निशान और दो प्रधान नहीं चलेंगे' म्हणत लढा देणारे डॉ. मुखर्जीच होते. जम्मू-काश्मीरची एकेकाळी वेगळी घटना होती, ध्वज वेगळा होता आणि जम्मू-काश्मीरच्या राजकीय नेतृत्वाला मुख्यमंत्रीच नाही तर पंतप्रधान म्हटले जात होते. जम्मू-काश्मीर आज जे देशाच्या मुख्य प्रवाहात आले आहे, त्याचे श्रेय डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनाच आहे. हे करताना डॉ. मुखर्जी यांना आपल्या प्राणाचे बलिदान करावे लागले. देशाचे पंतप्रधान म्हणून अटलबिहारी वाजपेयी यांचे योगदान अनन्यसाधारण असे आहे. पोखरण येथील अणुचाचण्या त्यांच्याच कार्यकाळात करण्यात आला. खरोखरच या तिन्ही महापुरुषांकडून देशाने प्रेरणा घेण्याची गरज आहे. ज्यांना आदर्श मानावे म्हणून आपले आतापर्यंत ब्रेनवॉशिंग करण्यात आले, त्यातील अनेकांचे योगदान तपासले तर हे तीन अस्सल महापुरुष देशाचे दीपस्तंभ ठरतात. या तिन्ही नेत्यांच्या देशावर असलेल्या उपकाराची कोणत्याच मार्गाने परतफेड करता येणार नाही. फूल ना फुलाची पाकळी म्हणून लखनौत या तिन्ही महापुरुषांचे भव्यदिव्य असे पुतळे उभारण्यात आले, याबद्दल योगी सरकारचे तसेच मोदी सरकारचेही अभिनंदन केले पाहिजे. कारण त्यांनी देशाच्या खऱ्या महानायकांचा देशाला नव्याने परिचय करून दिला. आता मोदी सरकारने डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी आणि पंडित दीनदयाल उपाध्याय यांना मरणोत्तर भारतरत्न देऊन सन्मानित केले पाहिजे.

## यंगिस्तान

# रशीद मामू आणि मराठी मामा?

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या दोन मोठ्या घडामोडी घडल्या आहेत. छत्रपती संभाजीनगरचे रशीद मामू यांना उद्धव ठाकरे गटाने पक्षात सामावून घेतले आहे. मामू यांच्यावर दंगलीतील सहभागासह गंभीर आरोप आहेत. त्यामुळेच या प्रवेशावरून मोठा वाद निर्माण झाला आहे. चंद्रकांत खैरे यांनी उघडपणे विरोध केला आणि असा प्रवेश झाल्याने हिंदू मतदारांचा मोठा भाग दुरावेल, असा दावा केला. अंबादास दानवे यांनी मात्र हा प्रवेश मातोश्रीवर घडवून आणला आणि खैरे यांना माहिती न देता निर्णय घेतला. यामुळे उबाठा गटात खैरे-दानवे वाद पुन्हा उफाळला.

एकीकडे रशीद मामूसारख्या व्यक्तीला पक्षात सामावून घेण्यामुळे शिवसेनेच्या उबाठा गटात अंतर्गत कलह उफाळून आला आहे, तर दुसरीकडे विरोधकांकडून यावरून उद्धव ठाकरेंवर जोरदार टीका होत आहे. याच पृष्ठभूमीवर, मनसेचे नेते प्रकाश महाजन यांनी मनसेला रामराम ठोकून एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. या दोन्ही घटना सलग घडल्यामुळे हा एक स्पष्ट पॅटर्न आहे असं वाटतं. मामू फॅक्टर (मराठी-मुस्लिम समीकरण) राबवून मुस्लिम मतांचा पाठिंबा मिळवण्यासाठी मराठी माणसाला मामा म्हणजे मूर्ख बनवण्याचा. प्रकाश महाजन काही महिन्यांपूर्वी मनसेला सोडचिठ्ठी दिली होती. आता शिवसेनेत प्रवेश करताना त्यांनी ''चंदू मामा नंतर आले, आधी रशीद मामू आला'' अशी टीका केली. तसेच ''एकनाथ शिंदे माझ्यासारख्या मराठी माणसाला रात्री १२.३० वाजता भेटले. हे दुर्मिळ आहे,'' असंही त्यांनी म्हटलं. महाजन यांनी एकाच दगडात दोन्ही ठाकरेंवर निशाणा साधला आहे. उद्धव ठाकरे दंगलखोरांना पक्षात प्रवेश देतात तर राज ठाकरे ते सहन करतात. पण आपल्याच नेत्यांना ते भेटत नाहीत, असा संदेश त्यांना द्यायचा आहे. प्रकाश महाजन हे ज्येष्ठ नेते आहेत. त्यांनी मनसेची बाजू सामान्य जनतेमध्ये आणि जिथे मनसेच्या नेत्यांना पक्षाचा संदेश व्यवस्थित मांडता येत नव्हता, तेव्हा महाजन मनसेची बाजू व्यवस्थित लावून धरत होते. ते एक चांगले प्रवक्ता, वक्ता आहेत यात वाद नाही. पण त्याचबरोबर ते ज्येष्ठ व अनुभवी देखील आहेत. त्यांनी वेळोवेळी मराठी अस्मितेसाठी आवाज उठवला आहेच, त्याचबरोबर ते हिंदुत्ववादी देखील आहेत



आणि त्यासाठी ते पुढाकार घेत असतात. मनसेने राजकीय धोरण म्हणून हिंदुत्व स्वीकारलं तेव्हा त्यांना प्रचंड आनंद झाला होता. असा नेता पक्षातून गेला याचं वाईट पक्षातील इतर लोकांना वाटत नाही, हे विशेष.

रशीद मामू हे छत्रपती संभाजीनगरचे माजी महापौर आणि काँग्रेसचे नेते म्हणून ओळखले जातात. त्यांचा राजकीय प्रवास विवादास्पद राहिला आहे. १९८६ मध्ये समान नागरी कायद्यासाठी शिवसेनेच्या मोर्चादरम्यान दगडफेक झाली होती आणि त्यात रशीद मामूंचा सहभाग असल्याचा आरोप आहे. या घटनेमुळे त्यांना एक वर्षाची तुरुंगवासाची शिक्षा झाली होती. शिवसेनेचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत खैरे यांनी स्वतः या घटनेचा उल्लेख करून रशीद मामूंच्या पक्षप्रवेशाला कडाडून विरोध केला आहे. खैरे म्हणतात की, ''ते दगड आम्ही खाल्ले आहेत. त्याची माहिती कदाचित पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यापर्यंत दिली गेली नसेल म्हणून अजाणतेपणी त्यांनी रशीद मामूला प्रवेश दिला असावा. मात्र त्यांना उमेदवारी मिळू देणार नाही. त्यांना तिकीट मिळणारही नाही. तसे झाले तर बघा मी काय करतो.'' भाजप महाराष्ट्र या अधिकृत पेजवरून ठाकरेंवर टीका करण्यात आली आहे. ''पाकिस्तान जिंदाबादच्या घोषणा देणारा, हिंदूंची घरे जाळणारा आणि दंगलीत सहभागी असलेला माणूस आता उबाठा गटाचा लाडका बनला आहे.'' छत्रपती संभाजीनगर नामांतराला रशीद मामूंनी विरोध केला होता, ही माहितीही भाजपने एक्सद्वारे समोर आणली आहे.

त्यामुळे रशीद मामू हे नगरसेवक होण्यासाठी, म्हणजे तिकीट मिळवण्यासाठी उबाठा गटात सामील झालेत हे उघड. रशीद मामूंच्या इनकमिंगमुळे ठाकरे गटाला छत्रपती संभाजीनगरमध्ये फायदा होऊ शकतो. कारण मुस्लिम मतदार उद्धव ठाकरेंवर आधीच मेहेरबान आहेत. गेल्या लोकसभा निवडणुकीत मुस्लिम मतदारांनी उद्धव ठाकरेंना भरभरून मते दिली होती. त्यांच्या बळावर ठाकरे पुन्हा एकदा डोकं वर काढू शकले. आता अब्दुल रशीद खान यांच्या प्रवेशाने आणखी मदत लाभत आहे. मामूंचा जनसंपर्क चांगला आहे. केवळ छत्रपती संभाजीनगरच नव्हे तर या प्रवेशामुळे इतर ठिकाणी देखील मुस्लिम मते मिळविण्यास ठाकरेंना मदत होईल.

उबाठा-मनसे युती होण्याआधी मामू फॅक्टर (मराठी व मुस्लिम मतदारांचे समीकरण) राबवले जाईल अशी चर्चा होत होती आणि रशीद मामूंच्या पक्षप्रवेशाने या फॅक्टरवर शिक्कामोर्तब झाला आहे. म्हणजे मराठी माणसाला साद घालायची... गुजराथी, उत्तर प्रदेश किंवा इतर लोकांविरुद्ध मराठी माणसाला भडकवायचं, या राजकारणापोटी अर्णव खैरेसारख्या लहान मराठी मुलाला जीव गमवावा लागतो, मराठी माणसाला बॉसच्या कानाखाली मारा असं म्हणत त्याला नोकरी सोडायला लावायची, म्हणजे मराठी मुलांच्या हातात दगड देऊन त्यांची कारकीर्द उद्ध्वस्त करायची आणि हे सगळं केल्यानंतर रशीद मामूला पक्षात प्रवेश द्यायचा. का? तर मामू फॅक्टर यशस्वी झाला पाहिजे? आणि या सर्वांत मोठे म्हणजे मराठी माणसाला मामा बनवायचं? तुम्हाला काय वाटतं मराठी जनांनो?

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

चंद्रकांत लोहाणा

# काँग्रेसची अवस्था आणि कारणे

संस्कृती आणि दिशाहीन झालेला काँग्रेस पक्ष सत्तेसाठी एवढा हपापलेला आहे की, विदेशामध्येही भाजपा नेतृत्वातील केंद्र सरकारला बदनाम करून राहुल गांधी यांना सत्ता हस्तगत करायची आहे. स्वकर्तृत्वाने काँग्रेसला सत्ता मिळणे शक्यच नाही. भारतीय नागरिक आणि या देशाच्या संस्कृतीशी समरस होईल, असा राहुल गांधींजवळ ना कोणता मुद्दा आहे, ना कोणतेही व्हिजन. यांचे कर्तृत्वही देशाला मान खाली घालवणारे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपाला दररोज बदनाम करण्याचे कारस्थान काँग्रेसने अतिशय नियोजन करून आखले आहे. राहुल गांधी यांचा प्रत्येक विदेश दौरा त्यासाठीच असतो की काय अशी दाट शंका आता नागरिकांना येऊ लागली आहे. राहुल गांधी यांच्या नुकत्याच झालेल्या जर्मनीच्या दौऱ्याने ही बाब पुन्हा अधोरेखित झाली आहे. लोकशाही मार्गाने आपण निवडून येऊ शकत नाही, हे विदारक सत्य काँग्रेस पक्षाला उमगले आहे. त्यामुळे मागील अकरा वर्षांचा कालखंड सत्तेविना घालविलेल्या काँग्रेसची अवस्था तर राहुल गांधी यांनी 'न घरका न घाटका' अशी करून ठेवली आहे. भारतीय संस्कृती, परंपरा आणि संस्कार याच्याशी या पक्षाचा काडीमात्रही संबंध नसताना लोकांनी तरी का बरं या पक्षाला निवडून द्यावं?

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सत्तेतून हटविण्यासाठी राहुल गांधी यांनी आपल्या देशामध्ये अनेक प्रयोग करून बघितले. नेपाळ, श्रीलंका या देशामध्ये युवकांनी सरकारविरुद्ध केलेल्या उठावाच्या पृष्ठभूमीवर येथेही तरुणांची डोकी भडविण्याची काँग्रेसची चाल फसली. निवडणूक आयोग व त्यासारखा अन्य संस्थांना लक्ष्य करूनही आपण सत्तेत खुर्चीपर्यंत पोहोचू शकत नाही, हे लक्षात आल्यावर राहुल गांधी यांनी नरेंद्र मोदी यांना परदेशामध्ये बदनाम करण्याचा कट आखल्याचे दिसून येत आहे. जगामध्ये असा एकही नेता नाही, जो परकीय भूमीवर आपल्याच देशाची बदनामी करून सत्ता मिळविण्याचा प्रयत्न करीत असेल. खरं तर परकीय भूमीवर स्वकीयांचे असे कृत्य देशद्रोही यासारखा गुन्हा मानला जायला हवा. परंतु, दुर्दैवाने तसे होताना दिसून येत नाही. आपल्या घराणेशाहीची परंपरा कायम ठेवण्यासाठी कोणीएक देशालाच वेठीस धरत असेल तर हे एक अक्षम्य पाप आहे. त्याचीच शिक्षा आज काँग्रेस पक्ष भोगत आहे. जनतेला गृहीत धरून अनेक दशके सत्ता काँग्रेसने उपभोगली. सत्तेच्या आवेशाखाली प्रत्येकवेळी विरोधकांना ठेचून काढण्याची या पक्षाची मनोवृत्ती. फक्त आम्हीच लायक ही या पक्षाची मगरुरी. त्यामुळे सत्तेसाठी वाट्टेल ते करण्याची यांची तयारी असते. त्यामुळे काँग्रेस पक्ष बेताल झाला आहे. जनतेने २०१४ पूर्वीचा आणि त्यानंतरचा काळ बघितला आहे. असंख्य घोटाळे आणि मानवतेला लाजवेल असा आणिबाणीचा क्रूर काळ लोकांनी अनुभवला आहे. आपल्या कार्यकाळामध्ये अनेक संस्थांना आपली स्थावर मालमत्ता समजून काँग्रेस पक्षाने आपल्या स्वार्थासाठी उपयोग केला आहे. त्यासाठी प्रत्येकवेळी येथील हिंदूंना वेठीस धरून दुय्यम वागणूक दिली आहे. या सर्व बाबींना छेद देत नरेंद्र मोदी यांनी खऱ्या अर्थाने २०१४ साली लोकशाहीची पुनर्स्थापना केली. नेमके हेच काँग्रेस पक्षाला नको आहे.

सत्ता उपभोगणे हा आमचा जन्मसिद्ध अधिकार असल्याच्या तोऱ्यात आजही राहुल गांधी आहेत. राहुल गांधी हे अपघाताने राजकारणात आले की, त्यांना त्यात रसच नाही. अनेक राज्यांतील विधानसभा निवडणुका व लोकसभा निवडणुका राहुल गांधी यांच्याच नेतृत्वात लढल्या गेल्या. केंद्रात सत्ता स्थापनेसाठी दोन डझन पक्षांनी एकत्र येऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पराभूत करण्यासाठी जीवाचे रान केले, नको ते आरोप केले. असे असतानाही तीन लोकसभा निवडणुका व अनेक राज्ये काँग्रेसने गमावली. राहुल गांधी यांचे नेतृत्व जनतेला मान्य नसल्याचे अनेक निवडणुकांत सिद्ध झाले आहे. विदेशात भारताच्या प्रतिमेला तडे जावेत असा त्यांचा सतत प्रयत्न असतो. विदेशात जाऊन वाटेल ते बरळण्याची सवय त्यांची गेलेली नाही. जेव्हा जेव्हा काँग्रेसचे युवराज विदेश दौऱ्यावर गेले तेव्हा त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर बिनबुडाचे आरोप करून त्यांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केला. हे देश आणि जनतेच्या हिताचे नक्कीच नाही.

९८८१७१७८५६

## मुंबई वार्तापत्र

नागेश दाचेवार

# सर्व काही खुर्चीसाठी!

२०१९ मध्ये भाजपासोबत निवडणूक लढून निकालानंतर आपल्या मित्रपक्षाच्या पाठीत खंजीर खुपसून, केवळ खुर्चीसाठी भिन्न विचारांच्या पक्षासोबत आघाडी केली. ज्या पक्षाच्या जिवावर मुख्यमंत्रिपदाच्या खुर्चीचा लाभ घेतला, आता महापालिकेच्या सत्तामोहात त्या पक्षासोबत दगाफटका केला आणि संपलेल्या पक्षासोबत युती केली. आता पालिका निवडणुकीचे निकाल लागले आणि यदाकदाचित उबाठाला सर्वाधिक जागा मिळाल्या आणि सत्ता स्थापन करण्यासाठी काही जागा कमी पडल्या, नेमक्या तेवढ्या जागा काँग्रेस किंवा शरद पवारांकडे असल्या तर, हे सत्तेसाठी भावाच्या पाठीत खंजीर खुपसतील आणि त्यांच्यासोबत जाऊन टुणकन खुर्चीत बसतील. नंतर पुन्हा भावाने माझ्या पाठीत खंजीर कसा खुपसला याची रुदाली करत हेच फिरतील. पहिले युतीच्या पाठीत खंजीर खुपसला. आता आता वज्रमूठ खिळखिळी करत आघाडीच्या पाठीत वार केला. ही यांची मोडस ऑपरेंडी आहे. शेवटी ''एक खुर्ची का सवाल है भाई...'' त्यासाठी आमचे उद्धव साहेब कोणत्याही थराला जाऊ शकतात. हे वेगळ्याने सांगायची गरज नाही.

एकेकाळी संपलेल्या पक्षाबद्दल बोलायलाही यांना लाज वाटायची. मात्र, त्याच पक्षासोबत मोठा गाजावाजा करत एकत्र येण्याची घोषणा करताना लाज नाही वाटली. गोरेगावच्या पत्राचाळीतील ६७२ मराठी कुटुंबांना गेल्या अनेक वर्षांपासून बेघर करून ठेवलेल्यांनी मराठी अस्मितेसाठी एकत्र येत असल्याची घोषणा केली, तेव्हा लाज नाही वाटली. १९९५ मध्ये दोन-पाच जागांचा फरक होता. शेवटच्या काळात मुख्यमंत्री बदलवला मात्र, भाजपाला मुख्यमंत्रिपद दिलं नाही. आणि २०१९ मध्ये निम्म्याहून कमी जागा मिळूनही मुख्यमंत्रिपद मागताना लाज वाटली नाही. मी कुठलीही निवडणूक लढवणार नाही किंवा माझ्या कुटुंबातलं कुणी निवडणूक लढवणार नाही. ठाकरे घराणं कुठल्याही सत्तेचं लोभी नाही, आम्ही सत्तेच्या पलीकडे लोकांची सेवा करण्यासाठी राजकारणात आहोत, या बाळासाहेब ठाकरेंच्या भूमिकेला तडा देताना यांना लाज वाटली नाही. बाळासाहेबांच्या कडवट हिंदुत्वाच्या भूमिकेशी फारकत घेताना यांना लाज वाटली नाही. सत्ता पदासाठी हपापलेले, त्यासाठी वाट्टेल ते करणारे लाचार, बेडर राजकारणी मी जवळून पाहिले, त्यांच्या रांगेत मला जायचे नाही, असे ठामपणे सांगणाऱ्या आपल्या वडिलांच्याच शब्दांना मातीत मिळवताना यांना लाज वाटली नाही. स्वत: आपल्याच वडिलांनी या महाराष्ट्राच्या जनतेला दिलेले शब्द पाळायचे नाहीत आणि इतरांवर दिलेला शब्द पाळत नसल्याचे आरोप करताना यांना लाज वाटत नाही. कारण ''निर्लज्जम् सदा सुखी'' म्हणतात ना तसल्या प्रकारात



हे लोक मोडतात.

बरं स्वतःचे धोक्यात असलेले राजकीय भवितव्य, अस्तित्व टिकविण्यासाठी हे दोन दगलबाज मोठ्या आणाभाका घेऊन, मराठी माणसांसाठी, मराठी अस्मितेसाठी एकत्र आल्याचा स्टंट काल परवा गळ्यातगळे टाकून करताना दिसले. गेली २० वर्षे स्वत:च्या सत्तेच्या हव्यासापोटी, स्वार्थासाठी एकमेकांचे कपडे फाडण्यात व्यस्त असताना, हा मराठी माणूस यांना आठवला नाही.

लोकसभेत विजय मिळाला, तेव्हा विशिष्ट समाजाचे आभार मानताना मराठी माणूस नाही आठवला. स्टॅलिन, खडगे हे हिंदूंना कॅन्सर म्हणत होते तेव्हा त्यांच्या मांडीला मांडी लावून बसत, आमचं हिंदुत्व वेगळे असल्याचे दाखले देत एका विशिष्ट समाजाला चुचकारण्याचा यांचा मागील काळात प्रयत्न दिसला. त्यामुळे यांना लाज नसली तरी, छत्रपतींच्या या मातीतल्या स्वाभिमानी मराठी आणि हिंदू समाजाने लाज विकलेली नाही. लोकसभेच्या वेळी खोट्या प्रचाराला बळी पडलेल्यांचे डोळे आता उघडलेले आहे. त्यामुळेच विधानसभेत आणि नगर पालिका- नगर पंचायतींच्या निवडणुकांमध्ये यांची जागा यांना दाखवून दिली. आणि आता मुंबईसह राज्याच्या विविध भागांतील महानगर पालिकेत देखील हा मराठी माणूस यांची लायकी दाखविल्याशिवाय राहणार नाही.

मुळात कधी कधी प्रश्न पडतो राज आणि उद्धव या दोघांना खरंच पक्ष चालवायचे आहेत का? मग हे लोक आपले पक्षच व्यवस्थित चालवू शकत नसतील तर महापालिका कशी चालवतील असा प्रश्न अनेकांना पडला आहे? आता बघा शिवसेनेत बंड झालं आणि पक्षाची सूत्रे एकनाथ शिंदेंकडे गेली. यावेळी उद्धव ठाकरेंनी जाहीर सभांमध्ये बोलताना, मी नव्यानं पक्ष उभा करेन, अशा तोऱ्यात बाता केल्या, पण रडगाणं गाण्यापलीकडे काही केल्याचं पुढील काळात दिसलं नाही. मुख्यमंत्रिपद गेलं, पक्ष हातचा गेला, आमदार-खासदारांनी साथ सोडली, नेते वेगळी वाट धरायला लागले. तरीही उद्धव साहेबांचा तोरा कमी होताना दिसत नाही आहे. पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी काही पावलं उचललेली ऐकिवात नाही. मग साहेब आणि युवराज दोघेही व्यस्त कुठे आहेत तर, म्हणे मातोश्री दोनच्या इंटेरिअर करण्यात, कलाकारांच्या कार्यक्रमांमध्ये, उद्योगपतींच्या विविह सोहळ्यांना हजेरी लावण्यात. असं करत राहिल्यास यांच्या हाती सत्ता दिली तर त्याचेही आपल्या पक्षाप्रमाणे तीनतेरा करतील, असे आता जनतेला वाटू लागले आहे. तिकडे सोबत आलेल्या दुसऱ्या भिडूची काही वेगळी परिस्थिती नाही. पक्षाला जनाधारच नाही. निवडणुकांमध्ये कितीही कोणतेही मुद्दे हाताळले तरी लोक मतच देत नाहीत. स्वत:च्या मुलाला निवडून आणू शकले नाही. नेते कार्यकर्त्यांना साहेब भेटत नसल्याची ओरड आहे. एवढी परिस्थिती असूनही, ज्यांना पक्षात राहायचं आहे त्यांनी राहावं, ज्यांना जायंच आहे त्यांनी जावं, हा तोरा काही यांचाही कमी झालेला नाही. आणि वरून म्हणतात एकदा हा महाराष्ट्र माझ्या हातात द्या. बघा कसा सुतासारखा सरळ करतो. अरे बाबा पहिले स्वत: सरळ वाग, अशी आता जनता म्हणू लागली आहे.

खरं तर पार्टटाईम राजकारणी असलेले हे दोन्ही भाऊ उतार वयातही ऐशोआराम करत असतात आणि निवडणुका आल्या की, मराठी माणसांवरचं यांचं प्रेम उफाळून येतं. मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा डाव यांना अचानक आठवतो. पण दहा वर्षे पूर्ण बहूमतातलं केंद्रात सरकार असताना, काश्मीरसारखा आंतरराष्ट्रीय पातळीवर वादात अडकलेला मुद्दा एका दणक्यात संपुष्टात आणणाऱ्यांसाठी मुंबई स्वतंत्र करायचीच असती तर, काय वेळ लागला असता? हे साधं गणित या दोन भावांना समजलं नसलं तरी, या महाराष्ट्राला आणि मुंबईकरांना उमजलं आहे. आपल्या निवडणूक चिन्हाचं तोंड दोन वेळा बदलणाऱ्यांनी आपली भूमिका किती वेळा बदलली, हे काय जनतेला माहिती नाही? राजकारणामुळे दुरावलेले दोघे राजकारणासाठी एकत्र आले. यातला स्वार्थ न समजण्याएवढी जनता दुधखुळी आहे? त्यामुळे स्वत:च्या स्वार्थासाठी राजकारण करणाऱ्यांची ही नौटंकी यावेळी चालणार नाही. किंबहुना मराठी माणूस चालू देणार नाही, एवढं मात्र निश्चित!

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### मुंबईचे लोकसंख्याशास्त्रीय बदल आणि घुसखोरीचे संकट

टाटा सामाजिक विज्ञान संस्था (टीआयएसएस), मुंबई या संस्थेने डिसेंबर २०२५ मध्ये एक महत्त्वपूर्ण अहवाल सादर केला आहे. त्यानुसार, मुंबईच्या लोकसंख्याशास्त्रात वेगाने बदल होत असून, २०२५ पर्यंत शहरातील हिंदूंची संख्या ५४ टक्क्यांपर्यंत खाली येण्याची शक्यता वर्तवली आहे. आशिया खंडातील समाजकार्य आणि संशोधनातील अग्रगण्य संस्था असलेल्या टीआयएसएसने अभ्यासात म्हटले आहे की, अवैध घुसखोरीमुळे मुंबई शहराच्या मूळ ओळखीला आणि सांस्कृतिक रचनेला मोठा धोका निर्माण होऊ शकतो. आज देशातील विविध राज्यांमध्ये बांगलादेशी आणि रोहिंग्यांची संख्या वाढत आहे. विशेषत: आसामसारख्या राज्यांमध्ये परिस्थिती अधिक चिंताजनक आहे. तेथील काही जिल्ह्यांतील लोकसंख्येचे प्रमाण इतके बदलले आहे की, एकेकाळी अल्पसंख्यक असलेला समाज आता बहुसंख्यकांच्या बरोबरीने उभा राहिला आहे. जगातील प्रत्येक सार्वभौम देश आपल्या सीमांचे रक्षण करण्यासाठी कठोर कायदे करतो आणि घुसखोरांना कायदेशीर प्रक्रियेद्वारे परत पाठवतो. मात्र, पश्चिम बंगाल सरकारने अद्याप जमीन उपलब्ध करून न दिल्यामुळे सीमेच्या मोठ्या भागावर कुंपण घालण्याचे काम रखडले आहे. येथे एकूण ९१३ किमी सीमेपैकी बहुतांश भाग अद्याप उघडा आहे. भौगोलिक आव्हाने : सुमारे ३७२ किमीची सीमा नदी क्षेत्रात येते, जिथे कुंपण घालणे कठीण आहे. सध्या केवळ ४०४ किमी सीमेवर कुंपण पूर्ण झाले आहे. या भौगोलिक आणि प्रशासकीय त्रुटींचा फायदा घेऊन घुसखोर सहजपणे भारतीय हद्दीत प्रवेश करतात. दुर्दैवाची बाब म्हणजे, स्थानिक पातळीवरील काही राजकीय हितसंबंधांमुळे या घुसखोरांना आधार कार्ड आणि मतदार ओळखपत्रासारखे भारतीय नागरिकत्वाचे पुरावे सहज उपलब्ध करून दिले जातात. टीआयएसएससारख्या प्रतिष्ठित संस्थेने दिलेला हा इशारा भविष्यातील सामाजिक संघर्षाची नांदी ठरू शकतो.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

### तरुण भारतच्या शताब्दीनिमित्त सुरेख सांस्कृतिक कार्यक्रम

दै. तरुण भारतच्या शताब्दीनिमित्त वर्ध्यात आयोजित एक सुंदर, आगळावेगळा कार्यक्रम गुरुवारी पाहण्यात आला. मुंबईच्या मेघना आणि हेमंत साने यांचा कथा- काव्य-नाट्य - गीत असा सगळा संगम त्यात होता. या प्रकारचा हा पहिलाच अनुभव! फोटोसेशन ही कथा आजच्या जिकडे तिकडे फसवणूक होत असलेल्या जगात माणसातील चांगुलपणाही टिकून आहे, हे सांगणारी! तर टायगरचा सल्ल्यामध्ये ज्योतिष सल्ला देणारा वगैरे प्रसंग असले तरी वेळप्रसंगी आपल्या प्रश्नांचं उत्तर हे आपल्या वागणुकीतच दडलेलं असतं, हे सांगणारी!

कवी सुरेश भटांच्या आठवणी त्यांच्याच शैलीत सांगितल्या. तसेच आईवडिलांच्या आठवणीतून - बाबा घाबरतात आईला हे वैश्विक सत्य मांडून हास्याची खसखस पिकवली! कांदे-पोहे कार्यक्रमाचा दमदार अनुभव गाठीशी असलेल्या नववधूचे रंगतदार किस्से ऐकताना मजा आली. मेघना साने यांचं कथाकथन, एकपात्री प्रयोग यांच्या मध्ये हेमंत साने यांनी गीते सादर केली. झाली फुले कळ्यांची, येशील, येशील, येशील राणी, वारा गाई गाणे ही अतिशय सुरेख गीते तितकीच सुंदर ते गायिले. सोबतच मेघना यांच्या वडिलांनी लिहिलेले एक गीतही स्वत: चाल लावून त्यांनी प्रस्तुत केले. शेवटी मेघना यांनी स्वरचित लावणी सादर केली. तासाभरात कलाविश्वाचा सुरेख असा फेरफटका श्रोते मारून आले.

**हर्षदा मशानकर**/८२३७८२१४४९

## आजचे संघगीत-८९

शनिवार, २७ डिसेंबर २०२५

### भगवंताचे जया लाभले चिरविजयी वरदान

भगवंताचे जया लाभले । चिरविजयी वरदान ।  
संघावाचुन, कोण स्विकारिल । काळाचे आव्हान? ॥धृ॥

परंपरेचे, पौरुषाचे। पराक्रमी पुरुषांचे ।  
पुनीत पावन, घडते येथे । पूजन वसुंधरेचे ।  
मांगल्याचे, पावित्र्याचे । राष्ट्रीय चारित्र्याचे ।  
संघशक्तिने, चरित्र घडते । बाल-तरुण-प्रौढांचे ।  
इथेच मिळतो मायभूमिला । अग्रपुजेचा मान ॥१॥

पुण्यपुरातन, इथे सनातन । ध्वज भगवा आमुचा ।  
ग्राम नगर गिरिकंदरि डोले । जगी दिग्विजयाचा।  
विश्वगुरुपदी सदा नांदला । विजयी जगताचा ।  
नानक गुरुचा, महाराणाचा । विक्रमी शिवबाचा ।  
नील अंबरी फडकत असता । चढे नवे अवसान ॥२॥

काल्पनीक प्रांतांच्या सीमा । भेद इथे ते सरले ।  
जाति-पंथ-भाषेचे अंकुर । कधी न इथे रुजले ।  
भिन्नत्वातुन अभिन्नतेचे । विशाल मंदिर उठले ।  
अजिंक्य-अविचल मंदिरात या । केशवदर्शन घडले ।  
कोटि कोटि हृदयांत चिरंतन । कार्याचा अभिमान ॥३॥

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# सुरभी महोत्सवातील स्पिरीचूअल टूर ऑफ इंडिया सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात संपन्न

## सुरभी महोत्सवातील कार्यक्रमास रसिकांचा उत्स्फूर्त सहभाग, विद्यार्थ्यांत जल्लोषाचे वातावरण

**सेलू,/प्रतिनिधी-** सुरभि महोत्सवातील स्पिरीचूअल टूर ऑफ इंडिया सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

येथील श्रीराम प्रतिष्ठान आयोजित सुरभि महोत्सवानिमित्त प्रॉस्परस पब्लिक स्कूल या शाळेचे स्पिरीचूअल टूर ऑफ इंडिया हा सांस्कृतिक कार्यक्रम विद्याविहार संकुल येथे पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटन मा . श्री. रवि डासाळकर कृ. ऊ. बा. समिती सेलू, व मा. श्री. तुकाराम कदम मुख्याधिकारी न. प. सेलू यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय रोडगे, प्रतिष्ठानच्या सचिव डॉ. सविता रोडगे, रामेश्वर गटकर , गणेश काटकर, अन्वर पठाण, सुशील नाईक नवरे , अशोक शेलार , काका आवटे , डॉ. अपूर्वा रोडगे , तसेच पालक प्रतिनिधी सौ. पल्लवी आवटे , सौ अनिता वासलवार तसेच संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रा.महादेव साबळे, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ प्रगती क्षीरसागर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. याप्रसंगी प्रतिवर्षी प्रमाणे प्रिन्स अवॉर्ड सौरभ मोगल तर प्रिन्सेस अवार्ड रिया टेंबरे यांना दिला गेला. या पुरस्काराने संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ संजय रोडगे व प्रमुख मान्यवर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांच्या पालकांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार म्हणजे केवळ एका क्षेत्रातील यश नसून, विद्यार्थ्याच्या सर्वांगीण विकासाचा सन्मान असतो. या मध्ये विद्यार्थ्याची शैक्षणिक प्रगती, शिस्त आणि वर्तन, हजेरी, सहशालेय उपक्रम, क्रीडा नैपुण्य, नेतृत्व गुण आदीचे मुल्याकन करण्यात येते. यापुरस्कारातून विद्यार्थ्यामध्ये आत्मविश्वास वाढतो, व्यक्तिमत्व विकाससह प्रोत्साहन मिळते. सांस्कृतिक कार्यक्रमाबरोबरच विद्यार्थ्यांना अभ्यासाव्यतिरिक्त त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्याच्या उद्धेशाने सुरभी महोत्सव आहे. एक



महिन्याहून अधिक विद्यार्थ्यांनी केलेल्या सरावाचे सादरीकरण सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे केली जाते. त्यांना आत्मविश्वास व प्रोस्ताहन उपस्थित पेक्षकाकडून अपेक्षित आहे. आमचा विद्यार्थी प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर रहावे या दृष्टीकोनातून अश्या प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. असे बोलताना डॉ. संजय रोडगे म्हणाले. सेलू शहर हे मराठवाडयाची सांस्कृतिक राजधानी असून श्रीराम प्रतिष्ठाने आपल्या आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमामधून सेलू शहराची एक वेगळी ओळख डॉ. रोडगे यांनी निर्माण केली आहे. उपस्थित पालकांना विनंती की, विद्यार्थ्यांना खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, भाषण अंगी उतरवले पाहिजे त्यांना प्रेरणा दिली पाहिजे. संस्कारची जडणघडण कश्यापद्धतीने करावयाची हे या शाळेतून दिसते. डॉ.रोडगे यांनी सुरभि महोत्सवातून बाल कलाकारांना हक्काचे व्यासपीठ उभे केल्याचे दिसून आले असे प्रतिपादन तुकाराम कदम यांनी केले. रामेश्वर गटकळ बोलताना म्हणाले की, सुरभि महोत्सव हा श्रीराम प्रतिष्ठानचा उल्लेखनीय उपक्रम असून डॉ. संजय रोडगे यांनी सेलू शहरात शैक्षणीक वातावरणास चांगले वळण देत असल्याचे आज प्रत्यक्षदर्शी येथे आल्यास दिसले. एवढ्या मोठ्या प्रमाणावर विद्यार्थांना व्यासपीठ तालुक्याच्या ठिकाणी उपलब्ध करून दिले हे विद्यार्थी दशेच्या दृष्टीने खुप महत्वाचे आहे. या कार्यक्रमाचे प्रसंगाने सर्वांना धार्मिक क्षेत्रांचे प्रत्यक्ष दर्शन झाले. आध्यात्मिक क्षेत्र हे मानवी जीवनाला केवळ भौतिक गरजांपुरते मर्यादित न ठेवता, त्याला एक सखोल अर्थ आणि आनंद देते.

ज्यामुळे व्यक्ती स्वतःच्या सर्वात सुंदर आणि शक्तिशाली स्वरूपात जीवन जगू शकते. विद्यार्थ्यांनी केलेले सादरीकरणाचे सर्वांनी खूप कौतुक केले . या सांस्कृतिक कार्यक्रम प्रसंगी शाळेतील विद्यार्थी, पालक सेलू शहरातील नागरिक मोठ्या प्रमाणवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेच्या मुख्याध्यापिका प्रगती क्षीरसागर यांनी केले. सूत्रसंचालन सारिका ताठे गीता सोनवणे यांनी केले.

## संक्षिप्त वृत्त...

### टोनी वरपुडकर यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश

परभणी,दि.२६(प्रतिनिधी) : भारतीय जनता पक्षाचे नेते विजयराव वरपुडकर यांचे चिरंजिव ऐश्वर्य उर्फ टोनी वरपुडकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष आमदार राजेश विटेकर व शहर जिल्हाध्यक्ष प्रताप देशमुख यांच्या उपस्थितीत शुक्रवारी (दि. २६) राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

यावेळी टोनी वरपुडकर यांच्यासोबत गजानन विश्वनाथ जोगदंड, सय्यद अतिक सय्यद अमीर व सुरेश पांचाळ यांनीही जाहीर प्रवेश केला. या प्रवेशामुळे शहरात व प्रभाग क्रमांक ५ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अधिक बळकट झाला आहे. या पक्षप्रवेशास विजयराव जामकर, रामेश्वर आवरगंड, माजी नगरसेवक राजू शिंदे, सुरेश काळे, दिपक वारकरी आदी उपस्थित होते.

### महानगरपालिका निवडणुकीसाठी वसंतराव नाईक कृषी विद्यापीठातील इमारत अधिगृहीत

निवडणूक अधिकारी नितीन नार्वेकर यांनी केली पाहणी

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने निवडणूक प्रक्रियेसाठी आवश्यक असलेली मतदान यंत्रांची प्राथमिक तपासणी, सिलिंग कार्यवाही, मतदान केंद्रांवर पथके रवाना करणे, मतदानानंतर ईव्हीएम व निवडणूक साहित्य जमा करणे तसेच मतमोजणी केंद्र स्थापन करण्यासाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील आरकेव्हीवाय वर्कशॉप, कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयातील ड्रॉइंग हॉल लॅब व वर्गखोली क्रमांक ३ ही इमारत अधिगृहीत करण्यात आली आहे.

या इमारतीची पाहणी व निवड निवडणूक अधिकारी नितीन नार्वेकर, निवडणूक निर्णय अधिकारी जिवराज डापकर, विद्या मुंडे, उदयसिंह भोसले, रतनसिंह साळोक, उपायुक्त प्रज्ञावंत कांबळे व पवन देशमुख यांनी केली. त्यानुसार संबंधित इमारत परभणी महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यात आली असून येथे मतदान यंत्रांची प्राथमिक तपासणी व सिलिंग प्रक्रिया, मतदान केंद्रांवर पथके पाठविणे, मतदानानंतर ईव्हीएम व साहित्य जमा करणे तसेच मतमोजणी केंद्र उभारण्याची संपूर्ण कार्यवाही पार पाडण्यात येणार आहे.

### बजरंगी हनुमान चालीसा मंडळाद्वारे रविवारी परभणीत १०८ हनुमान चालीसा सामूहिक पठण :

महेश मंदिर परिसरात २१०० दिवे पेटवून प्रकाशोत्सव साजरा केला जाणार

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील बजरंगी हनुमान चालीसा मंडळाच्या वतीने रविवारी २८ डिसेंबर रोजी १०८ हनुमान चालीसा सामूहिक पठण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील विष्णू नगरातील महेश मंदिरात सकाळी ८ वाजल्यापासून सामूहिक पठण सुरू होईल, तर संध्याकाळी ६.३० वाजता महाआरती संपन्न होणार आहे.

यानिमित्त महेश मंदिर परिसरात २१०० दिवे पेटवून प्रकाशोत्सव साजरा केला जाणार आहे. मंडळाची सुरुवात २०१० साली चार हनुमान भक्तांनी केली होती आणि दर शनिवारी हनुमान चालीसा पठणाचे आयोजन सुरू झाले. आता हा उपक्रम शहरातील जवळपास ५१ कुटुंबांपर्यंत पोहोचला आहे. मंडळातील सदस्य दर शनिवारी रात्री १० ते ११ या वेळेत एका सदस्याच्या घरी जमतात आणि हनुमान चालीसाचे सात पाठ, दोन भजन व श्रीराम स्तुतीसह आरती करतात. कोरोना काळात सामूहिक पठणावर मर्यादा होत्या; तरी सर्व सदस्यांनी वैयक्तिक पठण सुरू ठेवले. मोठा सण शनिवारला आला तर सामूहिक पठण मंगळवारी होईल. या उपक्रमात व्यापारी, डॉक्टर्स, इंजिनियर्स, उद्योजक, वकील, नोकरदार यासह महिला, पुरुष व लहान मुलेही उत्साहाने सहभागी होतात.

बजरंगी हनुमान चालीसा मंडळ रामनवमीच्या दिवशी शोभायात्रेदरम्यान सर्व भाविकांना थंड पेय वाटपाचा उपक्रमही राबवते. गेल्या वर्षीच्या कार्यक्रमात १०८ भाविकांनी सहभागी होऊन १६ हजार हनुमान चालीसाचे सामूहिक पठण केले होते. पठणामुळे मानसिक शांती, सकारात्मक ऊर्जा, अडचणींवर मात करण्याची शक्ती तसेच आत्मविश्वास वाढतो, असे भाविकांचे म्हणणे आहे. आयोजकांनी या वर्षीच्या उपक्रमात वेळेचे कुठलेही बंधन नसल्याचे सांगितले असून, दिवसभरात कधीही भाविकांनी सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

### चोरी प्रकरणातील आरोपी पोलिसांच्या ताब्यात : स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**परभणी,/प्रतिनिधी :** पाथरी पोलिस ठाणे अंतर्गत चोरीच्या प्रकरणातील विशाल वसंतराव दुधाटे या आरोपीला स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले.

पाथरी पोलीस ठाण्यात गु.र.नं. ३६०/२०२५ अंतर्गत भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२), ३३१ (४) प्रमाणे चोरीचा गुन्हा नोंद करण्यात आला होता. या गुन्ह्याच्या तपासासाठी पोलीस अधीक्षक रविंद्र सिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली व अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुंजाळ यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नियुक्त करण्यात आले होते. या पथकात पोलीस निरीक्षक विवेकानंद पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक जगताप, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक चट्टे, केंद्रे, भुजबळ, सातपुते, चाटे, चव्हाण, डुबे, ढवळे, पौळ यांचा समावेश होता.

तपासादरम्यान प्रकरणातील आरोपी विशाल वसंतराव दुधाटे (रा. ज्ञानेश्वर नगर, पाथरी) याने हा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.

**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, **०२. पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०३. मानवत -** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,

**०४. पालम -** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०५. सेलू -** शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

### मोरेगाव येथील नदी पात्रातून वाळूचा उपसा करणारा ट्रॅक्टर जप्त

**सेलू,/प्रतिनिधी:** तालुक्यातील मोरेगाव येथील दुधना नदीपात्रातून अवैध वाळू उपसा करणारा एक ट्रॅक्टर उपविभागीय अधिकारी प्रतिभा गोरे यांनी मंगळवार (दि. २३) रोजी दुपारी चार वाजताच्या सुमारास खेर्डा शिवारातील वालूर-मोरेगाव रस्त्यावर कारवाई करून ताब्यात घेतला.

दुधना नदीपात्रातून मोठ्या प्रमाणावर वाळू चोरी होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर उपविभागीय अधिकारी प्रतिभा गोरे आणि वाहन चालक सतीश घुले यांनी गुप्त सापळा रचला. यावेळी वालूर-मोरेगाव रस्त्यावरून वाळूने भरलेला भगव्या रंगाचा ट्रॅक्टर जात असताना तो अडविण्यात आला. तपासणीदरम्यान ट्रॅक्टर चालकाकडे वाळू वाहतुकीचा कोणताही अधिकृत परवाना नसल्याचे निष्पन्न झाल्याने सदर ट्रॅक्टर जप्त करून तहसील कार्यालयात जमा करण्यात आला.

मोरेगाव, पिंपरी (बु.), काजळी, रोहिणा, सोन्ना व खेर्डा परिसरातील दुधना नदीपात्रातून भरदिवसा वाळूची राजरोस तस्करी सुरू असल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे, यापूर्वी अनेक वेळा महिला तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांनी कारवाईचा प्रयत्न केला; मात्र त्यांना रिकाम्या हाताने परतावे लागले. स्थानिक यंत्रणेला जे शक्य झाले नाही, ते महिला उपविभागीय अधिकाऱ्यांनी करून दाखवल्याने वाळू तस्करांना नेमका कोणाचा आशीर्वाद आहे, अशी चर्चा आता तालुक्यात सुरू आहे.

दुधना नदीपात्रातून बेसुमार वाळू उपसा सुरू असल्याने पर्यावरणाचा गंभीर ऱ्हास होत आहे. पोलीस व महसूल प्रशासनाच्या नाकावर टिच्चून हे प्रकार घडत असतील, तर ही बाब प्रशासनासाठी लाजिरवाणी असल्याची प्रतिक्रिया सुज्ञ नागरिकांतून व्यक्त होत.

### अपंगांसाठीची व्हीलचेअर थेट भंगारात!

#### मानवत आठवडे बाजारातील धक्कादायक प्रकार

**महेश दिशागत**

**मानवत,/प्रतिनिधी:** अपंग व्यक्तींना अत्यावश्यक असलेली व्हीलचेअर थेट भंगारात टाकल्याचा धक्कादायक प्रकार मानवत शहरातील आठवडे बाजारात उघडकीस आला आहे. विशेष म्हणजे या व्हीलचेअर नव्याकोऱ्या असून त्यावरील प्लास्टिकचे संरक्षक आवरण (मेनकापड) देखील काढलेले नव्हते, तरीही त्या भंगारामध्ये फ ेकून दिल्याचे आढळून आले. आठवडे बाजार परिसरातील भंगारात अपंग व्यक्तींना लागणाऱ्या साहित्याचा खच पाहून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. व्हीलचेअर, लोखंडी फ्रेम, चाके आणि इतर उपयोगी भाग अक्षरशः कवडीमोल दरात भंगारात टाकण्यात आले असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. या साहित्याबाबत "हे कोणत्या



शासकीय विभागाचे की एखाद्या रुग्णालयाचे?" असा सवाल उपस्थित झाला असून शहरात चर्चेला उधाण आले आहे. जर हे साहित्य शासकीय निधीतून खरेदी केलेले असेल, तर तो सरळसरळ शासकीय निधीचा गैरवापर ठरतो. दुसरीकडे, रुग्णालय किंवा आरोग्य यंत्रणेशी संबंधित असल्यास संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणे गरजेचे असल्याची मागणी होत आहे. विशेष म्हणजे, अनेक अपंग व्यक्ती आजही व्हीलचेअरसाठी सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवत असताना, उपयोगात न आलेले आणि नव्यासारखे साहित्य भंगारात जाणे हे प्रशासनाच्या उदासीनतेचे आणि अनागोंदी कारभाराचे ज्वलंत उदाहरण मानले जात आहे. या प्रकरणाची तत्काळ चौकशी करून संबंधित विभाग, रुग्णालय किंवा जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, तसेच भंगारात टाकलेले साहित्य जप्त करून गरजू अपंग व्यक्तींना उपलब्ध करून द्यावे, अशी जोरदार मागणी नागरिक, सामाजिक कार्यकर्ते व अपंग संघटनांकडून केली जात आहे.

प्रश्न कायम: अपंगांच्या हक्कावर गदा आणणारे हे साहित्य नेमके कुणाच्या आदेशाने आणि कोणाच्या दुर्लक्षामुळे भंगारात गेले? चौकशी होणार की प्रकरण नेहमीप्रमाणे गुंडाळले जाणार?

### महानगरपालिका निवडणुकीसाठी शुक्रवारी १९ अर्ज दाखल

**परभणी,/प्रतिनिधी:** महानगरपालिका निवडणुकीसाठी शुक्रवार २६ डिसेंबर रोजी अर्ज दाखल करण्याच्या चौथ्या दिवशी सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत एकूण १९ उमेदवारांनी आपली नामनिर्देशनपत्रे निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात सादर केली.

दाखल झालेल्या अर्जांमध्ये प्रभाग क्र. ४-ब मधून ठाकूर हर्षाली (शिवसेना-उबाठा), प्रभाग क्र. ५-ड मधून झांबड रितेश (भारतीय जनता पार्टी), प्रभाग क्र. ७-ब मधून फैमुदा बेगम शेख सलीम (जनता दल-सेक्युलर), प्रभाग क्र. ७-क मधून शेख खदीर जमील (अपक्ष), प्रभाग क्र. ९-ब मधून नाईकनवरे हरिवंदा शंकरराव (अपक्ष), प्रभाग क्र. १२-अ मधून वायवळ भिमराव उद्धवराव (भाजपा), प्रभाग क्र. १३-अ मधून राहुल गौतम कांबळे (अपक्ष), प्रभाग क्र. १३-ब मधून उजमा बेगम लियाखत खान (अपक्ष) यांचा समावेश आहे.

तसेच प्रभाग क्र. १३-क मधून ताज खान फिरदोस बेगम (अपक्ष) व सायेमा बेगम अयाजुद्दीन शेख (अपक्ष), प्रभाग क्र. १३-ड मधून लंगोटे विकास प्रभाकर (अपक्ष), प्रभाग क्र. १४-अ मधून इरफाना बेगम समंदर खान (अपक्ष), प्रभाग क्र. १४-ब मधून खैरूनिसा बेगम युसुफ खान पठाण (अपक्ष), प्रभाग क्र. १४-क मधून शेख ताहेराबी हसन (अपक्ष), प्रभाग क्र. १४-ड मधून मूधन शेख अहमद शेख हसन (अपक्ष) यांनी अर्ज दाखल केले.

प्रभाग क्र. १५-इ मधून दरक नंदकिशोर गंगाप्रसाद (शिवसेना-उबाठा), दरक नंदकिशोर गंगाप्रसाद (अपक्ष) व मुदगलकर अनिल माणिकराव (भाजपा) यांनी उमेदवारी अर्ज सादर केला. प्रभाग क्र. १६-क मधून खोबे शाम वैजनाथराव (अपक्ष) यांनी अर्ज दाखल केला. या चौथ्या दिवशी एकूण १९ उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल झाल्याची माहिती देण्यात आली.

### रोकडेवाडी येथे मुख्यमंत्री समृद्धा पंचायतराज अंतर्गत आरोग्य शिबीस संपन्न



**पालम,/प्रतिनिधी-** गाव रोकडेवाडी प्रा.आ केंद्र रावराजूर येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज २०२४/२०२५ अंतर्गत आरोग्य विभागा मार्फत आरोग्य शिबीर घेण्यात आले या मध्ये ऐकून ९२ नागरिकांची तपासणी करण्यात आली.या प्रामुख्याने अतिरिक्तदाब, मधुमेह, संसर्गजन्य,आसंसर्गजन्य आजार,शाळेतील विद्यार्थी त्याची तपासणी केली, व अंगणवाडी तिला चिमुकल्या बालकांची तपासणी करण्यात आली उपक्रमासाठी गावातील प्रथम नागरिक मा सरपंच रामेश्वर केशवराव निळे , जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक वर्ग, वैद्यकीय अधिकारी डॉ बोबडे मॅडम,समुदाय आरोग्य अधिकारी डॉ मुन्नावर सर श्री सालमोटे,श्री कुलकर्णी,श्री डाके आशाताई मिनाक्षी नागेश निळे,अंगणवाडी सेविका वाघमारे मॅडम,मदतनीस निळे मॅडम व तुकाराम रानगीरे सह गावातील सर्व नागरिकांनी चांगले सहकार्य केले.

### प्रभाग क्रमांक पाच मधून राष्ट्रवादी काँग्रेसच्या गडामध्ये काँग्रेसचे मोहम्मद माज उमेदवार विजय

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी-** नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीमध्ये नगरपरिषद जिंतूर प्रभाग क्रमांक पाच मधून काँग्रेसचे माज यांनी मारली बाजी हा गड गेल्या काही दिवसापासून राष्ट्रवादीचा ताब्यात होता परंतु या गडामधून काँग्रेसचे मोहम्मद माज नवयुवक तरुण व तडफदार उमेदवार निवडून आले आहेत.

प्रभाग क्रमांक पाच मधून मोहम्मद माज हे गेल्या अनेक दिवसापासून या वार्डातील व तरुण वतडफदार उमेदवार असून गेल्या अनेक दिवसांपासून या वार्डाच्या विकासासाठी ते मात्र कटिबद्ध आहे प्रभाग क्रमांक पाच मध्ये विकास हाच माझा ध्यास असून मतदारांनी माझ्यावर जो विश्वास टाकला त्या विश्वासाला मी कुठल्याही प्रकारचा तडा जाऊ देणार नाही व प्रभागांमध्ये लहान मुलांसाठीअंगणवाडी सिमेंट रस्ते इत्यादी कामे करणार वॉर्डामध्ये कुठल्याही प्रकारचा विकासाला मी कमी पडणार नाही व मतदारांनी जो माझ्यावर विश्वास टाकला त्या विश्वासाला मी कुठल्याही प्रकारचा तडफ जाऊ देणार नाही व विकास कामाला कमी पडणार नाही मतदारांच्या सुखदुःखामध्ये अहोरात्र मी पर्यंत करीत राहणार आणि सुखा दुखात




धावून जाणार माझ्यावर जो विश्वास टाकला त्या विश्वासाचे मी सोने करून दाखवीन हाच माझा ध्यास आहे मोहम्मद माझ तरुण व तडफदार उमेदवार असून या वार्डातील महिलांच्या समस्या असो की मतदारांच्या समस्या असो त्या समस्याला मी समोर जाऊन प्रत्येकाच्या अडीअडचणी सोडविल्याशिवाय स्वस्त बसणार नाही व या गडामध्ये हा गड राष्ट्रवादीचा असून या गडामध्ये राष्ट्रवादीच्या उमेदवारा पेक्षा जास्त मते मला मिळाले व मतदारांनी माझ्यावर जो विश्वास टाकला त्याबद्दल मी सर्व मतदारांचे जाहीर आभार मानतो व मी वार्डात कुठल्याही प्रकारचा कमी पडणार नाही .

असे ते म्हणाले निवडणुकीचे विजय प्रमाणपत्र घेताना निर् निवडणूकअधिकारी शैलेश लाहोटी उपजिल्हाधिकारी तथा जिंतूर ची तहसीलदार राजेशजी सर्व दे नायब तहसीलदार प्रशांत जी राखी नगर परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी इतर दिसत आहेत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अग्नि भडकला तर तो नियंत्रणात आणणे हे अशक्यप्राय ठरते-साध्वी प्रतिभाजी म.सा.

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ डिसेंबर**

अग्नि भडकला तर तो नियंत्रणात आणणे हे अशक्यप्राय ठरते असे प्रतिपादन साध्वी प्रतिभाजी म.सा यांनी केले. त्या बीड येथील तेरापंथ स्वाध्याय भवन गुजराती कॉलनी येथील प्रवचनमाले दरम्यान केले. त्या पारगाव तालुका वाशी येथील नवनिर्मित जैन स्थानकाच्या उद्घाटन व लोकार्पण कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी कोठा संप्रदाय प्रमुख महाराष्ट्र प्रवर्तनी पूज्य श्री प्रतिभा कवरजी महाराज या आपल्या चार साध्वी वृंदासह जात असताना, जैन धर्मियांचे मोठे क्षेत्र असणार्या बीडकरांच्या विनंतीला मान देवून दि.२६ डिसेंबर २०२५ रोजी बीड त्यांचे येथे आगमन झाले. यावेळी समाज बांधवांच्यावतीने त्यांचे बीड नगरीत उत्साहात स्वागत केले.

यावेळी प्रवचनमालेत बोलतांना साध्वी प्रतिभाजी म.सा. म्हणाल्या की, हिंदू व जैन संस्कृतीमध्ये नववर्ष हे चैत्र शुद्ध प्रतिपदा हे शालीवाहन शके तर कार्तिक शुद्ध प्रतिपदा हे विक्रम संवत म्हणून मराठी दिनदर्शिकावरून सुरू होतात. मात्र पश्चिमात्य संस्कृतीच्या अधीन आपण गेल्यामुळे या वर्षाअखेर आपण अमंगलरित्या आनंद साजरा करतो. त्यानुसारच आपल्यावर पडलेल्या त्यांच्या प्रभावाने आपण याच दिवसाला वर्ष समजून त्यांचे रितीरिवाज पाळतो. या दृष्टिकोनातून नवीन लागणारे वर्ष हे आपणास सौख्य, संपन्नता, वैभवात जावो यासाठी मंगल कामना करतो. कारण पुढील नववर्षातून चांगले करण्याचा त्याचा मानस असतो, त्यासाठी साधुसंताचा आशीर्वाद मिळाला तर तो समाधानाचा ठरतो.



दि.२६ डिसेंबर रोजी तेरा पंथ स्वाध्याय भुवन येथे बोलताना त्या म्हणाल्या या भौतिक सुखातील संसाराच्या व्यापात परमेश्वर कोठे आहे? याला आपण विसरलेलो आहोत.

आपण मात्र दुःखाच्या वेळी याच परमेश्वराची आराधना करतो. ज्याप्रमाणे सकाळी प्रार्थने नंतर परमेश्वरापुढे नंदादीप लावून तो नंदादीप प्रज्वलित राहावा म्हणून वार्यापासून त्याचे संरक्षण करतो, तोच हा वारा ज्यावेळी कापसाच्या गंजीला लागलेल्या अग्नीला स्पर्श करतो त्यावेळी तो भडकतो आणि त्याला नियंत्रणात आणणे अशक्यप्राय बनते. असेच माणसाच्या जीवनात ज्यावेळी तो सुखाग्नीने भडकलेला असतो त्यावेळी तो इतर कोणाचाही विचार न करता आपले आयुष्य विनाशाकडे घेऊन जातो. परंतु ज्यावेळी अडचणीत येतो त्यावेळी परमेश्वराची आराधना करून त्याच्या सानिध्यात जाण्याचा प्रयत्न करतो. जसा दिव्याला कुठल्या हवेचा त्रास होऊ नये म्हणून सुरक्षित केले जाते तद्वतच त्याला कळते इतर वाम मार्गाने न जाता आपण आपल्या आयुष्याचे चिंतन हे परमेश्वराच्या नामस्मरणाने करावे. आणि या सुखी संसाराचा पुरुषार्थ करुन धैर्याची हिम्मत बांधून आपले कार्य साधावे. यातच मानवाचे हित आहे असे सांगतांना साध्वीजी म्हणाल्या, आपल्या अंगी समजदारी, इमानदारी व जबाबदारी या गुणांचा अवलंब करावा असाही उपदेश त्यांनी उपस्थितांना केला. प्रवचनाचा कार्यक्रम सकाळी ८.४५ ते ९.४५ या वेळेत तेरापंथ स्वाध्याय भवन गुजराती कॉलनी येथे दि.२६ डिसेंबर ते १ जानेवारी २०२६ पर्यंत सुरु असून याचा श्रावक-श्राविकांनी घ्यावा असे अवाहन समाज बांधवांच्या करण्यात आले आहे.

# बीड नगरपरिषदेतील भाजपच्या गटनेतेपदी डॉ.सारिकाताई क्षीरसागर



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ डिसेंबर**

बीड नगरपरिषदेतील भाजपच्या नगरसेवक गटाच्या गटनेतेपदी डॉ.सारिकाताई योगेश क्षीरसागर यांची निवड शुक्रवारी (दि.२६) करण्यात आली आहे. भाजपच्या नगरसेवकांच्या बैठकीत एकमताने हा निर्णय घेण्यात आला. या निवडीच्या ठरावाची पत्र जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे देण्यात आली.

नगरपरिषदेत भाजपचे १५ नगरसेवक विजयी झाले असून भाजपने प्रभावी कामगिरी करत मजबूत उपस्थिती निर्माण केली आहे. आता गटनेते पदाची जबाबदारी डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्यावर सोपविण्यात आली आहे. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, डॉ.योगेश क्षीरसागर, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, जिल्हा सचिव शांतिनाथ डोरले, जिल्हा सरचिटणीस गणेश लांडे यांच्यासह भाजपचे नगरसेवक, पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान, गटनेतेपदी निवड झाल्यानंतर डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री पंकजाताई मुंडे यांच्यासह नेते, पदाधिकारी, सहकारी नगरसेवक आणि कार्यकर्त्यांचे आभार मानत, बीड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि नागरिकांच्या प्रश्नांसाठी प्रभावीपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या नियोजनात बीड तालुक्यात भाजपकडून जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीची तयारी सुरु

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ डिसेंबर**



आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपने तयारी सुरू केली आहे. शहरातील के.एस.के. महाविद्यालयाच्या सभागृहात रविवार, दि.२८ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता ही बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस इच्छुक उमेदवारांनी उपस्थित रहावे, असे आवाहन भाजपचे बीड ग्रामीण मंडळ प्रमुख मनोज पाटील, राणा डोईफोडे व अशोक रसाळ यांनी केले आहे.

बीडमध्ये होणाऱ्या या बैठकीच्या माध्यमातून आगामी निवडणुकांची रणनिती ठरविणे, संघटन अधिक बळकट करणे तसेच जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी इच्छूक उमेदवारांकडून अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया राबवली जाणार आहे. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया भाजपच्या राष्ट्रीय सचिव, पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार असून, स्वतः इच्छूक उमेदवारांच्या मुलाखती घेणार आहेत. माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, भाजपा नेते बाळराजे पवार, भाजप राज्य परिषद सदस्य अक्षय मुंदडा, युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया पार पडेल. बीड तालुक्यासाठी जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, माधव निर्मळ, सतीश मुंडे व संजय आंधळे हे प्रभारी म्हणून जबाबदारी सांभाळणार आहेत. या सर्व नियोजन बैठका शंकर देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार असून, आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत भाजपला भरीव यश मिळवून देण्याच्या दृष्टीने या बैठका अत्यंत महत्त्वाच्या ठरणार असल्याचे पक्षाकडून सांगण्यात आले आहे.



दरम्यान, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी इच्छूक उमेदवारांनी बीड तालुक्यासाठी नियुक्त प्रभारींकडे आपले अर्ज व नाव नोंदणी करावी, असे आवाहन भाजपचे बीड ग्रामीण मंडळ प्रमुख मनोज पाटील, राणा डोईफोडे व अशोक रसाळ यांनी केले आहे.

डॉ.योगेश क्षीरसागर ताकद लावणार

बीड नगरपरिषद निवडणुकीत डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली १५ नगरसेवक विजयी झाले. त्यांच्या या यशाबद्दल पक्षश्रेष्ठींकडून कौतुक होत आहे. आता डॉ.क्षीरसागर हे आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठीही ते ताकद लावणार आहेत.

# महिला व मुलींच्या सुरक्षेसाठी पोलीस प्रशासनाचा पुढाकार

## नवीन बीएनएस कायद्याबाबत स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयात विशेष कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ डिसेंबर**

महिला व मुलींच्या सुरक्षेसाठी नवीन भारतीय न्यायसंहिता (BNS) कायद्यात देण्यात आलेल्या प्राधान्यांबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने स्वा.सावरकर महाविद्यालय, बीड येथे महिला तक्रार निवारण समिती आणी सखी सावित्री समितीच्यावतीने विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर , आर्ट ऑफ लिविंगचे संतोष सावंत यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यशाळेमध्ये महिला व मुलींच्या सुरक्षेसाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपाययोजना, पोलीस प्रशासनाची भूमिका, तसेच नवीन बीएनएस कायद्यातील महिला व बालकांच्या संरक्षणासंदर्भातील महत्त्वाच्या तरतुदी व प्रावधानांची माहिती विद्यार्थिनींना सविस्तरपणे देण्यात आली. सध्याच्या काळात मैत्रीची जवळीक वाढवून, फोटो काढून नंतर ब्लॅकमेल करण्याचे प्रकार वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर, अशा घटनांपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, अनोळखी व्यक्तींशी संपर्क साधताना घ्यावयाची काळजी याबाबत मुलींना मार्गदर्शन करण्यात आले.



यावेळी प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांनी सांगितले की, महाविद्यालयात मुलींच्या सुरक्षेसाठी तक्रार पेटी (Complaint Box) उपलब्ध करून देण्यात आली असून विद्यार्थिनी आपल्या तक्रारी गोपनीय पद्धतीने नोंदवू शकतात आणि त्यावर तात्काळ व योग्य ती कार्यवाही केली जाते. तसेच विद्यार्थिनींना पोलीस विभागाचा ११२ टोल फ्री नंबर, पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांनी सुरू केलेला क्यूआर कोड, तसेच महिलांसाठी तयार करण्यात आलेला दामिनी सुरक्षा व्हॉट्सअॅप ग्रुप यांची माहिती देण्यात आली. या कार्यशाळेमुळे मुलींमध्ये कायदेशीर जाणीव, आत्मविश्वास आणि सजगता वाढण्यास मदत होणार आहे, तसेच महिला सुरक्षेबाबत समाजात सकारात्मक संदेश पोहोचेल असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. स्वाती कुलकर्णी, तर आभार डॉ संगीता ससाने यांनी मानले

# हुतात्मा पापासिंह माध्यमिक विद्यालयाची शैक्षणिक सहल उत्साहात संपन्न

## पश्चिम महाराष्ट्रातील ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांचा विद्यार्थ्यांनी घेतला आनंद; निसर्ग आणि संस्कृतीचा घडला दर्शन

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.२७ डिसेंबर**

येथील हुतात्मा पापासिंह माध्यमिक विद्यालयाची शैक्षणिक सहल शैक्षणिक वर्ष २०२५-२६ अत्यंत उत्साहात आणि आनंदी वातावरणात संपन्न झाली. या सहलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ऐतिहासिक वारसा, धार्मिक परंपरा आणि आधुनिक मनोरंजनाचा सुवर्णसंगम अनुभवता आला.

भक्ती आणि शक्तीचा अनोखा प्रवास

सहलीची सुरुवात धारूर येथून झाली. प्रवासादरम्यान विद्यार्थ्यांनी पंढरपूर येथे विठ्ठल-रक्मिणीचे दर्शन घेऊन आध्यात्मिक ऊर्जा मिळवली. त्यानंतर नृसिंहवाडीच्या पवित्र संगमावर आणि कणेरी मठ येथील वैशिष्ट्यपूर्ण ग्रामजीवन प्रदर्शनाला भेट दिली. या भेटीमुळे विद्यार्थ्यांना आपल्या प्राचीन संस्कृतीची आणि ग्रामीण जीवनाची सखोल माहिती मिळाली.

ऐतिहासिक आणि निसर्गरम्य स्थळांची सफर

कोल्हापूरची शान असलेला शाहू पॅलेस, ऐतिहासिक पन्हाळगड आणि रंकाळा तलावाचा परिसर पाहून विद्यार्थी थक्क झाले. पन्हाळगडाच्या भेटीमुळे शिवरायांच्या जाज्वल्य इतिहासाची उजळणी झाली. तसेच ज्योतिबा डोंगरावरील निसर्गसौंदर्य आणि धार्मिक वातावरणाने सहलीत चैतन्य भरले. सहलीचा शेवट शिवतेज वॉटरपार्क येथील जलक्रीडांच्या जल्लोषात करण्यात आला, जिथे विद्यार्थ्यांनी मनसोक्त आनंद लुटला.


शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग

ही सहल यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री. सोळंके बाळासाहेब सर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्यासोबत श्री. प्रशांत कांदे



सर, श्री. सोळंके माधव सर, श्रीमती जायभाये मॅडम व अन्य शिक्षक वृंदाने विद्यार्थ्यांची विशेष काळजी घेतली. शाळेच्या विद्यार्थिनींनी शिस्तबद्ध पद्धतीने आणि मोठ्या संख्येने सहभागी होऊन सहलीचा आनंद द्विगुणित केला.पुस्तकी ज्ञानासोबतच प्रत्यक्ष अनुभवातून मिळालेले हे ज्ञान विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास मुख्याध्यापकांनी यावेळी व्यक्त केला. सुरक्षित आणि ज्ञानवर्धक सहल पूर्ण झाल्याबद्दल पालकांनीही शाळेचे कौतुक केले आहे.

# भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई कै. दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयात वंदे मातरम या गीताच्या शतकोत्तर सुवर्ण जयंती वर्षा निमित्त वकृत्व स्पर्धेचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**अंबड दि.२७ डिसेंबर**

दि. २७ डिसेंबर २०२५ रोजी वंदे मातरम शतकोत्तर सुवर्ण जयंती निमित्ताने आज सकाळच्या प्रार्थनासभेत वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये इयत्ता चौथी या वर्गातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता .सहभागी विद्यार्थ्यांमध्ये कु.वैष्णवी चोथे कु. ब्राम्ही जाणवे कु.आरोही वायखंडे कु.भूमी वाघ यांनी वंदे मातरम बद्दल आपले मनोगत व्यक्त केले. यानंतर शाळेचे मुख्याध्यापक माननीय श्री प्रदीप जी जोशी सर यांनी आपल्या मार्गदर्शनात बोलताना सांगितले की,या गीताला दीडशे वर्षे पूर्ण झाले आहे.या गीताचा सार देशभक्ती तसेच वंदे मातरम या गीताचे महत्त्व देशाभिमान,मातरम' हे बंकिमचंद्र चटर्जी यांनी रचलेले एक प्रेरणादायी गीत आहे, जे भारताचे राष्ट्रीय गीत म्हणून ओळखले जाते, जे स्वातंत्र्यलढ्यात क्रांतिकारकांना ऊर्जा देणारे एक शक्तिशाली प्रेरणास्रोत ठरले; हे गीत 'आनंदमठ' या त्यांच्या कादंबरीत समाविष्ट आहे आणि सर्वप्रथम रवींद्रनाथ टागोर यांनी गायले होते. राष्ट्रीय एकता आणि स्वातंत्र्याच्या लढ्यातील प्रेरणा म्हणून आहे; हे गीत मातृभूमीला वंदन करून भारतीयांमध्ये राष्ट्रप्रेम, त्याग आणि समर्पणाची भावना जागृत करते, तसेच भारताच्या समृद्ध संस्कृतीचे प्रतीक आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्रीमती.मेघा वायकोस मॅडम यांनी केले. या कार्यक्रमाची सांगता कल्याण मंत्राने झाली.

# प्रा.प्रकाश शिंदे यांना पीएच.डी पदवी प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२७ डिसेंबर**



माजलगाव येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील लोकप्रशासन विभागात कार्यरत आसलेले प्रा. प्रकाश शिंदे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठा अंतर्गत लोकप्रशासन विषयात पीएच.डी प्रदान करण्यात आली आहे.

प्रा प्रकाश शिंदे यांनी प्रा. डॉ. भारत गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली नागरी समाजाची सुशासनातील भूमिका: महाराष्ट्रातील प्रशासकीय भ्रष्टाचार विरोधी जनअंदोलनाचे अवलोकन' या विषयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात शोध प्रबंध सादर केला होता. त्यांच्या संशोधन कार्याची दखल घेऊन त्यांना विद्यापीठाने पीएच.डी. प्रदान केली आहे.

प्रा.प्रकाश शिंदे यांच्या यशाबद्दल म.शि. प्र.मंडळाचे अध्यक्ष आ.प्रकाश सोळंके, यांच्यासह महाविद्यालय विकास समिती सदस्य ॲड.बी.आर.डक, प्राचार्य डॉ. जी.के. सानप, प्रभारी प्राचार्य डॉ. एन. के. मुळे,उपप्राचार्य डॉ.एम.ए.कव्हळे, उपप्राचार्य प्रकाश गवते, उपप्राचार्य पवन शिंदे, प्रबंधक प्रशांत चव्हाण,प्रा.डॉ. ज्ञानेश्वर शिंदे, प्रा. डॉ.बिलास काळे,प्रा.सुदर्शन स्वामी यांनी अभिनंदन केले आहे.

# आदर्श शिक्षक संजय चौसाळकर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ डिसेंबर**



धडपड आणि तळमळने कार्य करणाऱ्याला समाजात मान मिळतोच पण त्याच्या कार्याची पावती मिळत असते. आपल्या जीवनात गुरूला खूप महत्त्व आहे. आपल्यात संस्कार रूजविण्याचे कार्य शिक्षक करत असतो. एक आदर्श नागरिक घडविणे तसेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्याचे कार्य शिक्षक करत असतो. अशाच उत्कृष्ट कार्य करणारी चंपावती विद्यालयाचे आदर्श शिक्षक संजय अंबादासराव चौसाळकर सर या शाळेत दिनांक ४ जानेवारी १९९३ रोजी रुजू झाले. त्यांचे शिक्षण एम. ए. बीएड. इंग्लिश असून ते दहावी वर्गाला इंग्रजी शिकवतात. सरांचे वडील कै. अंबादासराव चौसाळकर हे जिल्हा परिषद शिक्षण विभागात आदर्श शिक्षक म्हणून कार्य केले. संजय चौसाळकर सरांची पत्नी ग्रहणी असून त्यांना दोन मुले आहेत. एक मुलगा एम.बी.बी.एस. शेवटच्या वर्षाला आहे. व मुलगी इंजिनियर होऊन तीचे लग्न झाले आहेत. सरानी शाळेतील अध्यापन सोबत इतर उपक्रम, जबाबदाऱ्या पार पाडल्या. सरांनी सतत ३१ वर्ष त्यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी शिकवले. याबरोबर शाळेतील इतर उपक्रमात त्यांनी एस.एस.सी .बोर्ड परीक्षक व नियमक म्हणून पंचवीस वर्षे काम केले. तसेच शाळेतील संगणक विभाग प्रमुख, सहल प्रमुख, आय. सी. टी. कक्ष प्रमुख, परिक्षा विभाग प्रमुख, इंग्रजी डिपार्टमेंट प्रमुख असे विविध काम केले. सरांनी इंग्रजी विषयाच्या मार्गदर्शनासाठी अनेक शाळेत व्याख्याने दिली. तसेच त्यांनी पुणे येथील हुजूर पागा व इतर अनेक ठिकाणी व्याख्याने दिली. इंग्रजी तज्ञ मार्गदर्शक म्हणून इंग्रजी शिकवणाऱ्या शिक्षकांना योग्य मार्गदर्शन केले. तसेच सरांनी शाळेत इंग्रजी व्याकरण आधारित स्पर्धा घेतल्या. विद्यार्थ्यांची अभियोग्यता चाचणी विद्यार्थी कौशल्य चाचणी घेऊन विद्यार्थ्यांचा कल कुणीकडे आहे हे सांगत होते. सरांना या कार्यासाठी समाजातील अनेक संस्थांनी त्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार दिले अहिल्यादेवी होळकर आदर्श शिक्षक, शक्ती प्रतिष्ठान आदर्श शिक्षक, रोटरी क्लब आदर्श शिक्षक, लायन्स क्लब आदर्श शिक्षक तसेच द्रोणाचार्य पुरस्कार त्यांना मिळाला. तसेच शाळेतील इंग्रजी विषयाचे शंभर टक्के निकाल लागल्यामुळे संस्थे तर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. शक्ती प्रतिष्ठान मध्ये ते सचिव म्हणून काम करतात. वर्षभरातील विविध उपक्रमांचे नियोजन ते करतात. सरांचा इंग्रजी विषयावर खूप अभ्यास आहे. त्यांनी इंग्रजी विषयाचे ए टू झेड इंग्लिश ग्रामर, आयडियल इंग्लिश ग्रामर, स्पोकन इंग्लिश ग्रामर ,बुक फॉर रायटिंग साईड असे अनेक पुस्तके त्यांनी प्रकाशित केले.सर ३१डिसेंबर २०२५ रोजी सेवानिवृत्त होत आहेत त्यांना सेवापूर्तीच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा- **डॉ.वेदांत चौसाळकर**

# नादब्रह्म संगीत विद्यालयास अ.भा.गां.मंडळाच्या परीक्षा केंद्राची मान्यता

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ डिसेंबर**

येथील नादब्रम्ह संगीत विद्यालयास अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय, मुंबई या संस्थेच्या सन २०२६ पासुन एप्रिल सत्राच्या विशारद पुर्ण पर्यंतच्या परीक्षा केंद्राची मान्यता प्राप्त झाली आहे.स्व.पं.पलुस्करांनी १२५ वर्षांपूर्वी स्थापन केलेल्या अ.भा.गांधर्व मंडळाद्वारे देश विदेशात सांगितिक गायन, वादन आणि नृत्य परीक्षांचे एप्रिल आणि नोव्हेंबर अशा दोन सत्रात जवळपास १३०० परीक्षा केंद्रातुन परीक्षा घेतल्या जातात.नादब्रम्ह संगीत विद्यालयास नोव्हेंबर सत्रातील परीक्षा केंद्राची सहा वर्षांपूर्वीच मान्यता प्राप्त झाली होती.विद्यालयाद्वारे परीक्षा कार्याची पवित्रता व मंडळाची गरिमा लक्षात घेऊन संपूर्ण निष्ठा व प्रामाणिकपणे तसेच मंडळाच्या अनुशासनाचे पालन इत्यादी बाबींचा विचार करून अ.भा.गां.मंडळाने एप्रिल सत्राच्या परीक्षा केंद्रासही मान्यता दिली आहे.तसेच आता दोन्ही सत्रातील परीक्षा केंद्रांमुळे शहरातील तथा पंचक्रोशीतील संगीत साधक विद्यार्थ्यांची सोय होणार आहे.

याबद्दल अ.भा.गां.मंडळाचे अध्यक्ष बालासाहेब सुर्यवंशी, उपाध्यक्ष प्रा. डॉ.देवेंद्र कुलकर्णी,सचिव सुधाकर चव्हाण, रजिस्ट्रार विश्वास जाधव, परीक्षा नियंत्रक समिती तथा सर्व पदाधिकार्यांचे नादब्रम्ह संगीत विद्यालयाचे संचालक प्रा.महेश कुलकर्णी यांनी आभार मानले आहेत.

# मोरेश्वर संस्थान कोळवाडी येथे गुरुवर्य गंगाभारती महाराजांचा ३३ वा पुण्यतिथी सोहळा उत्साहात साजरा होणार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ डिसेंबर**

मोरेश्वर संस्थान, कोळवाडी येथे प. पू. १००८ गुरुवर्य गंगाभारतीजी महाराज यांच्या ३३ व्या पुण्यतिथी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून हा सोहळा दि. १५ ते १७ जानेवारी २०२६ या कालावधीत विविध धार्मिक व अध्यात्मिक कार्यक्रमांनी संपन्न होणार आहे.

पुण्यतिथी सोहळ्याचा प्रारंभ पौष वद्य १२ शके १९४७, गुरुवार दि. १५ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता होणार असून ह.भ.प. हरिहर भारती महाराज यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात येणार आहे. या सोहळ्याची सांगता पौष वद्य १४, शनिवार दि. १७ जानेवारी २०२६ रोजी होईल.

तीन दिवस चालणाऱ्या या पुण्यतिथी सोहळ्यात दररोज पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ६ ते ७ आरती तसेच सायंकाळी ५ ते ६ हरीपाठ असे दैनंदिन कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. शुक्रवार दि. १६ जानेवारी रोजी सायंकाळी ४ वाजता श्रींची महापूजा व त्यानंतर पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे.

# सामाजिक बांधिलकी सायकल यात्रा अयोध्येस झाली रवाना



**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. २७ डिसेंबर :** सामाजिक व राष्ट्रीय एकता आणि संस्कृती जपण्याचे ध्येय आजचा तरूण अहमदपूर सारख्या छोट्या शहरात देखील उराशी बाळगत पर्यावरण संरक्षण आणि निरोगी जीवनशैलीचे महत्व सांगत अहमदपूर ते प्रभू श्रीराम नगरी अयोध्या असा १२०० किलोमीटर सायकलिंग करत एक महत्त्वाचा संदेश घेऊन अहमदपूर ते अयोध्या निघाला.

अहमदपूर सायकलिंग क्लब चे ११ सदस्यांना येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी शुभेच्छ्या दिल्या या प्रसंगी पुष्पवृष्टी करण्यात आली. शेकडो नागरिकांच्या उपस्थितीत या यात्रेचा शुभारंभ करण्यात आला. विशेष म्हणजे या सायकल यात्रेत शेख कुल्ला यांच्या सहभागाने अहमदपूर ची सामाजिक एकता अधोरेखीत झाली.

यावेळी अहमदपूरचे नूतन नगराध्यक्ष स्वप्निल व्हत्ते, दिलीपराव देशमुख, ॲड. भारत चामे, रोटरीचे अध्यक्ष कपिल बिरादार, सचिव धीरेंद्र ढेले, पोलीस निरीक्षक विनोद मेत्रेवार तसेच नूतन नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते, क्रीडाप्रेमी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अहमदपूर सायकलिंग असोसिएशन, रोटरी क्लब अहमदपूर आणि रनर्स ग्रुप अहमदपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या सायकल यात्रेत एकूण ११ सायकलवीर सहभागी झाले आहेत. हे सायकल स्वार रोज सुमारे १५० किलोमीटर अंतर पार करत सायकलवीर अयोध्येस पोहचणार आहेत.

ही यात्रा श्रद्धेइतकीच संविधानातील बंधुता, समानता आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या मूल्यांचा सन्मान करणारी आहे. नवनाथ हंडे, धनंजय तोकले, भरत ईगे, सूर्यकांत साकोळे, कल्पक भोसले, अजबसिंग यादववंशी, शेख लुल्ला, तुकाराम उगीले, कृष्णा काळे, नामदेव बरुरे आणि सतीश गुरमे हे सायकलवीर सहभागी आहेत.

अहमदपूर चे तरुण छत्रपती शिवरायांना नतमस्तक होऊन प्रभू श्रीराम दर्शना साठी जात असल्याचे समाधान मंत्री बाबासाहेब पाटील यांनी व्यक्त केले.

# मैलारा मल्लण्णा देवरा जत्रा महोत्सवात पुजाऱ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**वलांडी, दि. २७ डिसेंबर :** बिदर जिल्ह्यातील भालकी तालुक्याच्या मैलारा गावात महिनाभर चाललेल्या मल्लण्णा देवरा जत्रा महोत्सवाच्या समारोप प्रसंगी, मंदिराने मंदिरातील वडीलधारी मंडळी आणि पुजाऱ्यांचा सत्कार केला.

मंदिराच्या सभोवतालच्या गणेश कुंड, थेप्पडा कुंड, ज्योतिर्लिंग मंदिर आणि घृतमारी मंदिरांमध्ये नैवेद्य अर्पण करण्यात आले. मंदिराने वडीलधारी मंडळी आणि मंदिराच्या प्रशासकांचा, तसेच नंतर कुलकर्णी सचिव संजीव कुमार सुंदल यांचा शाल पांघरून सत्कार केला.

महिनाभर, विविध राज्यांतील सात कोटींहून अधिक भाविकांनी कडाक्याच्या थंडीत मैलारा लिंगाच्या भक्तीत लीन होऊन देवाचे दर्शन घेतले आणि स्वतः ला पावन करून घेतले. आज, समारोपाच्या दिवशी, मंदिराच्या ज्येष्ठ वाग्गैय्यांसह अनेक



वाग्गैय्यांची पूजा करून आणि त्यांना कोतांबी (नैवेद्य) देऊन जत्रेची सांगता झाली. आलेल्या सर्व भाविकांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती आणि देवाचे वस्त्र प्रसाद म्हणून वाटण्यात आले.

समारोप समारंभाच्या निमित्ताने सज्जी रोटी, भजी, भर्ता, हुग्गी, अण्णा सांबार, होळीगे यासह शिवशरणप्पा वाग्गे, मुख्य पुजारी बसप्पा हिरिवाग्गे, पुजारी मल्लिकार्जुन हिरिवाग्गे, प्रकाश हिरिवाग्गे, आकाश हिरिवाग्गे, बीरप्पा पुजारी, पंडित पुजारी, शिवाजीराव जकनाळ, मारुती बालाथा, आनंद एकलर, अनिल एकलर, दशरथ अतिवाला, हणमंत कामठाणा, पंढरी बरदापुरा, बसवा मालेगाव, मल्लप्पा खानादला, प्रभू हिरिवाग्गे आणि शिवकुमार हिरिवाग्गे यांच्यासह ग्रामस्थ आणि भाविक उपस्थित होते.

# पोलिस महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केली किनगाव पोलीस ठाण्याची तपासणी

**तभा वृत्तसेवा**

**किनगाव, दि. २७ डिसेंबर :** नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक शहाजी उमाप (भा. पो.से.) यांनी गुरुवार, दि. २६ डिसेंबर रोजी किनगाव पोलीस ठाण्याची वार्षिक तपासणी केली.

या वेळी लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोळे तसेच किनगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिकराव डोके उपस्थित होते. यासोबतच किनगाव परिसरातील पोलीस पाटील संघटनेचे सर्व पुरुष व महिला पोलीस पाटील मोठ्या संख्येने उपस्थित होते. वार्षिक



तपासणीदरम्यान विशेष पोलिस महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पोलीस पाटलांशी सविस्तर चर्चा करून त्यांच्या कामकाजाची माहिती घेतली. यावेळी पोलीस पाटलांनी विविध समस्या व अडचणी मांडल्या. त्यावर प्रतिक्रिया देताना उमाप यांनी योग्य व नियमाप्रमाणे तक्रारींची दखल घेऊन आवश्यक ती कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट केले.

तसेच पोलीस पाटील संघटनेच्या वतीने विशेष पोलिस महानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोळे तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिकराव डोके यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी उपस्थित पोलीस पाटलांनी पोलीस प्रशासनाकडून मिळणाऱ्या सहकार्याबद्दल समाधान व्यक्त करत भविष्यातही समन्वय राखून काम करण्याचा विश्र्वास व्यक्त केला.

# सेवानिवृत्त शिक्षक सुरेश पांचाळ यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**वलांडी, दि. २६ डिसेंबर :** सीमा भागातील भालकी तालुक्यातील मेहकर येथील रहिवाशी असलेले आळवाई येथील शांतिनिकेतन उच्च प्राथमिक शाळेचे सहशिक्षक सन्माननीय सुरेश माणिकराव पांचाळ यांचा सेवानिवृत्ती बद्दल २४, डिसेंबर रोजी बुधवारी दुपारी ठीक तीन वाजता मेहकर येथील त्यांच्या राहत्या निवस्थानी सेवानिवृत्तीबद्दल त्यांच्या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून आळवाई येथील शांतिनिकेतन शाळेचे मुख्याध्यापक दादाराव जिंके, उमाकांत बिडवे, उल्हास कांबळे, बंडेपा पांचाळ, अण्णाराव सुतार, बाबुराव मंगणे, पत्रकार दत्तात्रय साबणे, बालाजी शिंदे, आप्पासाहेब पाटील, वीरशेट्टी कटाळे, वेंकटराव हाडोळे, मारुती सूर्यवंशी, हनुमंत भंडारे, सुवर्णा गादगे यांच्यासह या प्रमुख मान्यवरांच्या हस्ते पती-पत्नी सौ. जयश्री सुरेश पांचाळ यांचा सेवानिवृत्ती बद्दल मुख्याध्यापक शिक्षक शिक्षिका पाहुणे मित्रमंडळी व गावातील प्रतिष्ठित मंडळी यांच्या वतीने शालपुष्पहार फेटा व कपड्याचा फुल आहेर देऊन दोघा पती-पत्नीचा सात्विक सत्कार करण्यात आला.




सुरेश माणिकराव पांचाळ यांचे फर्स्ट अपार्टमेंट आळवाई येथील शांतिनिकेतन उच्च प्राथमिक शाळेमध्ये १७,०६,१९८७, रोजी शिक्षक म्हणून सेवेत रुजू झाले पहिली ते सातवीचे शिक्षण तुगाव हा येथील सरकारी शाळेत तर आठवी ते दहावीचे शिक्षण औराद शहाजानी येथील महाराष्ट्र विद्यालयात झाले नंतर ११ वि ते १२ वि इंटरशिप भालकी येथील शिवाजी कॉलेज येथे झाले सहशिक्षक म्हणून एकूण ३८ वर्ष चांगली सेवा देऊन ते सेवानिवृत्त झाले त्यांना एकूण ५ भाऊ विजय पांचाळ अनिल पांचाळ सुनील पांचाळ शशिकांत पांचाळ त्यांना एकूण ३ मुले भागवत पांचाळ आशिष पांचाळ रोहन पांचाळ यांच्यावतीने सौ जयश्री सुरेश पांचाळ यां आई-वडिलांना शाल पुष्पहार व प्रत्येकी ५ ग्राम सोन्याची अंगठी घालून सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हनुमंत भंडारे यांनी केले तर आभार प्रदर्शन भागवत पांचाळ यांनी मानले.

# पेन्शनर्स डे, वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात




**तभा वृत्तसेवा**

**शिरूर अनंतपाळ, दि. २६ डिसेंबर :** शिरूर अनंतपाळ (ता. शिरूर अनंतपाळ) येथे दि. २४ डिसेंबर २०२५ रोजी लातूर जिल्हा पेन्शनर्स असोसिएशन, लातूर यांच्या वतीने पेन्शनर्स डे तसेच २०२५ ची वार्षिक सर्वसाधारण सभा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान बापूराव आनंदराव देवंगरे यांनी भूषविले.तर संघटनेचे जिल्हाध्यक्ष भुसने साहेब, जिल्हा सचिव मानकर के. एस., तसेच संस्थात्मक तालुकाध्यक्ष व शिक्षण महर्षी प्रभाकरराव कुलकर्णी (पेटे बिडी) हे मान्यवर उपस्थित होते. याशिवाय माजी मुख्याध्यापक ज्ञानोबा चिवडे, सूर्यकांत गुरुजी येरोळकर, एस. एस. पाटील, मोहनराव भोसले, ॲड. रमेश उंबर्गे, पोपडे आदी मान्यवरांनी उपस्थिती लावली.

कार्यक्रमाची सुरुवात भारताचे सरन्यायाधीश मा. चंद्रचूड यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी ८० वर्षांवरील ज्येष्ठ पेन्शनर्सचा शाल, श्रीफळ व असा हा 'प्रभाकर' हे पुस्तक देऊन सन्मान करण्यात आला. सन्मानितांमध्ये हंद्राळे विठ्ठलराव, गुरुजी डाखरे सर, डॉ. उडदे रामराव, श्रीमती. रोशाबाई केशवराव चोचंडे, उमाकांत राव यांचा समावेश होता.

अध्यक्षीय समारोपात बापूराव देवंगरे यांनी पेन्शनर्सच्या विविध प्रश्नांवर आपले विचार मांडले. यावेळी जिल्हाध्यक्ष भुसने साहेब व जिल्हा सचिव मानकर सर यांनी पेन्शनर्सना शासकीय योजना, हक्क व प्रलंबित प्रश्नांबाबत सखोल माहिती व मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक व सूत्रसंचालन प्रा. चोचंडे प्रभाकर यांनी केले. मागील वर्षाचा अहवाल वाचन तालुका सचिव गुंडेराव आवाळे सर, तर आर्थिक अहवालाचे वाचन तालुका कोषाध्यक्ष वलांडे यांनी केले. आभार प्रदर्शन इंदलकर किशनराव यांनी केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नरहरे, गुंडे, फुलार, देशमुख मॅडम, फुलारी मॅडम, उमाकांत देवंगरे यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमात शिरूर आनंतपाळ तालुका भरातून अनेक पेन्शनर्सनी उपस्थिती नोंदवली, त्यामुळे कार्यक्रम अतिशय उत्साही व प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

# महात्मा गांधी महाविद्यालयात वीर बालदिवस साजरा

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. २७ डिसेंबर :** नानभारत ही शूर आणि वीरांची भूमी आहे. अनेक योध्यांनी आपले बलिदान देऊन भारतभूमीला वैभवशाली केले आहे. भारतामध्ये त्याग आणि बलिदानांचेही अनेक सर्वोच्च दाखले आपणास मिळतात. शीख धर्माचे दहावे गुरु, गुरू गोविंदसिंह यांच्या बाबा जोरावर सिंह आणि बाबा फतेहसिंह या दोन मुलांनी लहान वयामध्ये असताना दिलेले बलिदान हे त्यांच्या त्यागाचे व शौर्याचे सर्वोच्च प्रतीक आहे. असे प्रतिपादन डॉ यादव सूर्यवंशी यांनी केले.

याचे सविस्तर वृत्त असे की, उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या दिनांक २३ डिसेंबर २०२५ च्या शासन आदेशानुसार येथील विचार विकास मंडळ संचलित महात्मा गांधी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने बाबा जोरावरसिंह व बाबा फतेहसिंह यांचा बलिदान दिवस वीर बाल दिवस म्हणून साजरा करण्यात आला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ यादव सूर्यवंशी यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी त्यांनी भारतातील बहुविध धर्म, बहुविध पंथ व बहुविध भाषा-संस्कृतींचा उल्लेख करून हे विविधतेतील वैभव टिकवून ठेवण्यामध्ये येथील सर्व धर्मातील महामानवांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे राहिलेले आहे. शीख धर्मातील जोरावरसिंह आणि फतेहसिंह यांचे बलिदान हे खरे शौर्याचे आणि त्यागाचे प्रतीक असून, आजच्या विद्यार्थ्यांनी त्याचा बोध घेतला पाहिजे असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार हे होते. आपल्या अध्यक्षीय भाषणातून त्यांनी विद्यार्थ्यांना अभ्यास व कलागुणांच्या बरोबरीनेच नैतिक मूल्ये आणि कर्तव्यनिष्ठतेचा मूलमंत्र दिला. तसेच यावर्षी अतिवृष्टीच्या काळामध्ये चिलखा येथील ओढ्याच्या पुरात वाहून जाणाऱ्या




तीन मजूरांचे प्राण वाचविलेल्या रासेयो विद्यार्थी पवार सूर्यकांत सिताराम व कदम मारोती पुरूषोत्तम यांचा त्यांनी आज वीर बाल दिनी विशेष गौरव कैला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. बालाजी माकणे- पाटील यांनी केले. याप्रसंगी व्यासपीठावर राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रकाश देशमुख, प्रा. डी. जी. पुरी, प्रा. प्रकाश डवरे, पवार सूर्यकांत, राठोड आदिती यांची उपस्थिती होती. आभार डॉ प्रकाश देशमुख यांनी मानले. कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

## *राष्ट्र सेवा दल दिनदर्शिकेचे भूषण यांच्या हस्ते प्रकाशन*

***लातूर :*** *राष्ट्र सेवा दलाच्या लातूर जिल्हा शाखेच्या वतीने स्व. पन्नालाल सुराणा यांचे मुखपृष्ठ असलेली २०२६ दिनदर्शिकेचे प्रकाशन नुकतेच सर्वोच्च न्यायालयाचे ज्येष्ठ विधिज्ञ प्रशांत भूषण यांच्या हस्ते लातूर येथे करण्यात आले. लातूरच्या दयानंद सभागृहात स्व. मनोहरराव गोमारे यांच्या स्मृतिदिनानिम्मित आयोजित एका कार्यक्रमात हा प्रकाशन सोहळा पार पडला. यावेळी समजवादी नेते सुभाष वारे, डॉ.नागोराव कुंभार, अंनिसचे राज्य अध्यक्ष माधव बावगे, खासदार डॉ. शिवाजी काळगे, डॉ. गणेश गोमारे, मजविपचे शिवाजी नरहरे, आणि राष्ट्र सेवा दलाचे लातूर जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.*

# मेहकर गव्हर्मेंट हायस्कूल येथे दहावीच्या वर्गमित्रांचा मेळावा

**तभा वृत्तसेवा**

**वलांडी, दि. २६ डिसेंबर :** सीमा भागातील भालकी तालुक्यातील मेहकर येथे २१ डिसेंबर रोजी रविवारी सकाळी ठीक ११ वाजता मेहकर येथील गव्हर्मेंट हायस्कूल येथे १९८९-९० या वर्षातील दहावीच्या विद्यार्थी विद्यार्थिनींनी वर्गमित्रांच्या वतीने गुरुवंदना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या वर्गमित्र मेळावा कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून गव्हर्नमेंट हायस्कूलचे मुख्याध्यापक सन्माननीय प्रकाश बिरादार प्रमुख अतिथी म्हणून सेवानिवृत्त मुख्याध्यापक शिवराय पाटील सेवानिवृत्त शिक्षक शाहूराव पासमे, वामनराव पाटील, गोविंदराव ढाले ,कृष्णा कुलकर्णी, सेवानिवृत्त सेवक किसनराव खटपटे एस डी एम सी चे अध्यक्ष व्यंकट दंडवते बेस्ट अँकरिंग अशोकराव पाटील गुरुजी दिगंबर तेलंग, श्रीमंतराव गणेश वाडे, हीरासिंग भोई, संजीव मंगणे, अमृत पाटील , विशाल चिडगुपे, प्रशांत डोंगरे, पत्रकार दत्तात्रेय साबणे, वीरशटी करकले, सौ




मंगला नीलकंठ हिलालपुरे, एम टीव्ही कन्नडा चैनलचे पत्रकार महादेवी लाखे या प्रमुख मान्यवरांचा सत्कार शाल पुष्पर व स्वामी विवेकानंद प्रतिमा देऊन या वर्ग मित्रांच्या वतीने व शाळेच्या वतीने सर्व वर्ग मित्रांना ही शाल पुष्पहार देऊन सात्वीक सत्कार करण्यात आला.


या प्रमुख मान्यवरांच्या व वर्ग मित्राच्या हस्ते लक्ष्मी माता प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून हा कार्यक्रम सुरू करण्यात आला. आठवण शाळेची मैफिल वर्गमित्राची हा असा वर्ग मित्रांचा कार्यक्रम पहिल्यांदाच या मेहकर येथील गोरमेंट हायस्कूल मध्ये ३५ वर्षाच्या नंतर हा कार्यक्रम अगदी शांततेत पार पडला गोरमेंट हायस्कूलचे मुख्याध्यापक व शिक्षकांनी व वर्ग मित्रांनी व विद्यार्थी विद्यार्थिनींनी आपले अल्प परिचय दिले व मनोगत व्यक्त केले.

यावेळी वर्गमित्र भानुदास कांबळे यांच्यावतीने सर्व वर्गमित्र विद्यार्थी विद्यार्थिनींना शाल पुष्पहार पेढा व सुविचार प्रिंट पेपर देऊन सात्विक सत्कार करण्यात आला.

यावेळी सुभाष कांबळे, व्यंकट लाळे, संजय बिरादार, सत्यवान कुडपणे, यांच्यासह वर्गमित्र पंडित बिडवे, रणधीर बिरादार, राजू पाटील, अरविंद डोंगरे, धनाजी वाघमोडे, बालाजी ढोले, भानुदास कांबळे, लिंबराज पाटील, रुपेश पाटील, दत्ता पाटील, दुष्यंत साळुंखे, सुधाकर मोरे, सतीश कारभारी, मुकेश कारभारी, वैजनाथ बिडवे, दिलीप जाधव, मसाजी जेधे, शशिकांत पांचाळ, शिवाजी बिरादार, सतीश जोशी, व्यंकट गायकवाड, श्रीरंग गायकवाड, देविदास राठोड, अंबादास गायकवाड, सौ शोभा भोवी, सौ संगीता देशमुख, सौ जयश्री हुलसुरे, सौ सुमित्रा लंबे, सौ प्रभावती हंगरगे, सौ अनिता मोरे, सौ विजयालक्ष्मी बिरादार, यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक शिक्षिका सेवानिवृत्त मुख्याध्यापक सेवानिवृत्त शिक्षक वर्गमित्र विद्यार्थी विद्यार्थिनी व कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक बाबुराव पाटील गुरुजी यांनी केले तर आभार प्रदर्शन शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश बिरादार यांनी मानले.

# माजी आमदार धर्माजी सोनकवडे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये



**तभा वृत्तसेवा**

**देवणी, दि. २७ डिसेंबर :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री

अजित पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून व तसेच महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, माजी क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, आ. विक्रम काळे, राष्ट्रवादीचे प्रदेश प्रवक्ते सुरज चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात पक्षप्रवेश झाला.

पक्षप्रवेश झाल्याबद्दल देवणी तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी आदरणीय धर्माजी सोनकवडे यांनी अजित पवार व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करेन हे अभिवचन दिले.

या सत्कार सोहळ्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे गजानन भोपणीकर, युवक प्रदेश सरचिटणीस मनोज कन्नाडे, युवक शहराध्यक्ष प्रितम आष्ट्रे, जिल्हा सरचिटणीस प्रताप कोयले, ओबीसी सेल तालुकाध्यक्ष दत्ता चाळकापुरे, शहर कार्याध्यक्ष रितेश सूर्यवंशी, तालुका कार्याध्यक्ष अजय भोळे आदी उपस्थित होते.

यावेळी देवणी नगरपंचायतीचे माजी बांधकाम सभापती प्रा.डॉ. अनिल इंगोले, राष्ट्रवादीचे जिल्हा सरचिटणीस अनिल कांबळे, जितेंद्र शिवगे, महादेव रोटे, साईनाथ गायकवाड यांनी त्यांचे पक्षात स्वागत केले.

### मुदखेड तालुक्यातील जवळा मुरार येथील घटना

# मुलांनीच केला आई- वडीलांचा खून



**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २७ डिसेंबर-**

तालुक्यातील जवळा मुरार या गावी २५ डिसेंबर रोजी एकाच कुटुंबातील चौघांचे मृतदेह आढळून आल्याने खळबळ माजली होती. याबाबतचा वैद्यकीय अहवाल आल्यानंतर दोन्ही मुलांनी आपल्या आई-वडिलांच्या आजारपणाला कंटाळून त्यांचा गळा दाबून खून केला व स्वतः रेल्वेखाली येवून आत्महत्या केल्याचे निष्पन्न झाले. याबाबत बारड पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

बारड पोलीस ठाण्याच्या हद्दीत जवळा मुरार येथे २५ डिसेंबर रोजी एकाच कुटुंबातील चार जणांचे मृतदेह आढळून आले होते. आई-वडिलांनी गळफास घेतल्याचा दिखावा दिसून येत होता. तर त्यांची दोन मुले रेल्वेखाली येवून त्यांनी आत्महत्या केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत होते. याबाबत या चौघांचेही शवविच्छेदन केल्यानंतर रमेश होनाजी लखे व राधाबाई रमेश लखे या दोघा पती-पत्नीचा त्यांचीच मुले उमेश व बजरंग यांनी त्यांच्या सततच्या आजारपणाला कंटाळून त्यांचा गळा दाबून खून केल्याचे निष्पन्न झाले. वैद्यकीय अहवाल आल्यानंतर पोलिसांनी याबाबत खुनाचा गुन्हा दाखल केला असून, यात दोन्ही आरोपी त्यांची दोन्ही मुले आहेत. मात्र ते मयत झाले आहेत. या प्रकरणामुळे एकच खळबळ माजली होती व लखे कुटुंबियाबद्दल गावात हळहळ व्यक्त होत होती. मात्र शवविच्छेदनाचा अहवाल प्राप्त झाल्यांनतर रमेश लखे व राधाबाई लखे या दोघांचाही गळा दाबून खून करण्यात आल्याचे समोर आले आहे.

# ज्येष्ठ समाजसेविका मेधा पाटकर यांची पूरग्रस्त धानोरा गावास भेट



**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. २७ डिसेंबर-**

एके काळचा दुष्काळतग्रस्त मराठवाडा पुरग्रस्त झालाय जलवाहु परिवर्तन हव तस झाले नाही शासनाचे अधिकारी तात्काळ अमलबजावणी करीत नाहित म्हणून शेतकऱ्याना हाल अपेष्टा भोगाव्या लगतात असे मत नर्मदा बचाव आंदोलनाच्या प्रनेत्या ज्येष्ठ समाजसेविका मेधा पाटकर यांनी व्यक्त केले.

पाटकर ह्या दि. २४डिसेंबर २५ रोजीपुरग्रस्त धानोरा ता.भोकर गावास भेट देऊन तेथील शेतकरी नागरीकांच्या समस्या ऐकून घेतल्या आहेत.यावर्षी जुलै,ऑंगस्ट२०२५मध्ये ढगफुटी अतिवृष्टी मुळे शेतकऱ्यांच्या शेतातील पिके व माती खरडून वाहून गेल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले शेतातील विहिरी बुजून गेल्या घराघरात पाणी शिरले होते शासनातर्फे तुटपुंजी मदत मिळाली तर कांही लोकांना मदतच मिळाली नाही ही माहिती मिळाल्यानंतर मेधा पाटकर ह्या किनवट येथील साने गुरुजी रुग्णालय इमारतीचा लोकार्पण सोहळा आटोपून बुधवार दि.२४ डिसेंबर सायंकाळी भोकरला आल्या येथील संजीवनी हॉस्पिटलला भेट दिली असता डॉ.रामेश्वर भाले, डॉ.सौ.मनिषा भाले यांनी त्यांचे स्वागत केले.यावेळी सेवासमर्पणचे दिगंबर देशमूख, बालाजी तुमवाड, प्रा.उतम जाधव,पत्रकार विठ्ठल फुलारी आदी उपस्थित होते.

त्यानंतर सायंकाळी धानोरा गावात जावून शेतकरी व नागरिकांच्या समस्या ऐकून घेतल्या नागरिकांनी त्यांच्यासमोर यावर्षी ऑंगस्ट मध्ये पडलेल्या ढगफुटी पावसांने कसे नुकसान झाले गावात अल्पभूधारक शेतकरी, मोलमजूरदार असल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली लोकप्रतिनिधी व प्रशासनाचे प्रतिनिधी गावाला एकवेळ भेट दिली परंतु भरीव मदत दिली नसल्याचे तेथील सरपंच सौ. वंदना करपे आणि इतर नागरिकांनी सांगितले. तेव्हा मेधा पाटकर म्हणाल्या तुम्ही शेतकरी,नागरिक संघटित झाले पाहिजे जलसंपदा मंत्रालय, कृषी विभाग झोपलेल्या अवस्थेत आहे. शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. कृषी निती,जल वाहिणीचे परिवर्तन जागोजागी पाणी अडविणे नाला रूदी व सरळीकरण होत नाहीत असे अनेक शेतकरी हिताचे प्रश्न पाटकर यांनी उपस्थित केल्या. तलावातील गाळ अनेक वर्षापासून न काढल्यामुळे पाणी उथळ होऊन शेतात व घरात शिरून नागरिकांचे बेहाल होतात असे अनेक प्रश्न नागरिकांनी उपस्थित केले.यावेळी मेधाताई म्हणाल्या गावातील शेतकरी,नागरिकांनी शासनाचा अन्याय सहन न करता सर्वानी संघटित होवून शासन दरबारीं आंदोलन छेडले पाहिजे!त्या शिवाय सरकार जागे होत नाही. तुम्ही संबधित विभाग जिल्हाधिकारी यांना लेखी निवेदन द्या तुमच्या पाठीशी मी आहे.असा दिलासा ग्रामस्थाना मेधा पाटकर यांनी दिला. सूत्रसंचालन ज्येष्ठ कार्यकर्ते नागोराव शेंडगे बापू यांनी केले यावेळी जेष्ठ पत्रकार एल. ए. हिरे, डॉं. बालाजी कोंपलवार,राजेश करपे, श्रीनिवास लांमगे, सुभाष मुळेकर, सुभाष खांडरे,प्रल्हाद हमद, सिताराम करपे उपस्थित होते.

## माळेगाव यात्रेत मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाचा जागर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २७ डिसेंबर-**

क्षेत्र माळेगाव यात्रा ही मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या जनजागृतीचे प्रभावी माध्यम ठरली आहे. या अभियानाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेच्या वतीने उभारण्यात आलेल्या प्रदर्शनातून यात्रेकरूंमध्ये मोठ्या प्रमाणावर जागृती करण्यात आली. यात्रास्थळी ठिकठिकाणी माहितीपर बॅनर लावण्यात आले. या अभियानासाठी तयार करण्यात आलेल्या गीताची ध्वनीफीत वाजवून नागरिकांपर्यंत संदेश पोहोचविण्यात आला.

# शालेय विद्यार्थ्यांनी घेतला माळेगावच्या पारंपारिक यात्रेचा प्रत्यक्ष अनुभव



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २७ डिसेंबर-**

शालेय विद्यार्थ्यांना माळेगावच्या पारंपारिक यात्रेचे दर्शन घडावे तसेच यात्रेचा प्रत्यक्ष अनुभव घेता यावा, या उद्देशाने जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांच्या सहली काढण्याचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला जिल्ह्यातील अनेक शाळांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या उपक्रमांतर्गत लोहा, कंधार, अर्धापूर, नांदेडसह इतर तालुक्यांतील एकूण ३३ शाळांच्या सहली माळेगाव यात्रेत सहभागी झाल्या. या सहलींमधून जवळपास साडेपाचशे विद्यार्थ्यांनी माळेगाव यात्रेची पाहणी करून तिचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

माळेगाव यात्रेच्या ठिकाणी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या वतीने शैक्षणिक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनासाठी शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, माध्यमिक शिक्षणाधिकारी माधव सलगर व शिक्षणाधिकारी नियोजन दिलीप बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली गटशिक्षणाधिकारी सतीश व्यवहारे यांनी एक समिती स्थापन केली होती.

या समितीत अध्यक्ष म्हणून विस्तार अधिकारी डी. आर. शिंदे, तसेच केंद्रप्रमुख एम. बी. सोनकांबळे, डी. व्ही. मोहिते, केंद्रीय मुख्याध्यापक व्ही. जी. गायकवाड, जी. एन. धुळगंडे, जी. एस. उप्परवाड यांचा समावेश होता. याशिवाय या समितीत एकूण १८ सहशिक्षक सहभागी होते.

समितीतील सर्व सदस्यांनी यात्रेत आलेल्या शालेय विद्यार्थ्यांचे स्वागत करून शालेय शिक्षणाशी संबंधित विविध उपक्रम तसेच शैक्षणिक स्टॉल्सची माहिती दिली. विद्यार्थ्यांना माळेगाव यात्रेची सविस्तर माहिती देत प्रत्यक्ष यात्रास्थळी फिरवून मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद व उत्साह स्पष्टपणे दिसून आला.

दरवर्षीप्रमाणे यंदाही माळेगाव यात्रेसाठी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. पालकांसोबत आलेल्या सुमारे दीड ते दोन लाख मुला-मुलींनी देखील माळेगावची यात्रा अनुभवली तसेच येथील शैक्षणिक प्रदर्शनाला भेट दिली.

विद्यार्थ्यांना यात्रा म्हणजे काय, यात्रेतील परंपरा, थाटण्यात आलेली विविध दुकाने, श्री खंडोबाचे दर्शन, तसेच यात्रेचे सांस्कृतिक महत्त्व प्रत्यक्ष अनुभवातून समजावून देण्यात आले. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिकदृष्ट्या अत्यंत उपयुक्त ठरला असून त्यातून विद्यार्थ्यांना परंपरा, संस्कृती व सामाजिक जीवनाचे प्रत्यक्ष ज्ञान मिळाल्याचे मत शिक्षक व विद्यार्थ्यांनी व्यक्त केले.

## भोकर येथे आज बिरसा मुंडा जयंती

**नांदेड** -क्रांतिवीर भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त आज २८ डिसेंबर,२०२५ रोजी भोकर शहरात जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम किनवट रोडवरील माऊली मंगल कार्यालयात दुपारी २ वाजता संपन्न होणार आहे. या जयंती सोहळ्यास आ.भीमराव केराम, मा. आ.डॉ. संतोष टारपे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तुकाराम भिसे, जिल्हा नियोजन अधिकारी अर्जुनराव झाडे यांच्यासह विविध पदाधिकारी व अधिकारी मार्गदर्शन करणार आहेत. सकाळी ९ वाजता बिरसा मुंडा चौकातून मिरवणूक काढण्यात येणार आहे. या जयंती सोहळ्यास भोकर तालुक्यातील सर्व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन वस्तीगृह विद्यार्थी प्रतिनिधी, जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष बापूराव पाटील वागतकर व गंगाधर वानोळे यांच्यासह आयोजकांनी केले आहे.

## श्री साईबाबा निवासी अपंग विद्यालयात वीर बाल दिवस साजरा

**हदगाव** -येथील श्री. साईबाबा निवासी अपंग विद्यालयात दि.२६ डिसेंबर रोजी वीर बाल दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



हा दिवस श्री. गुरु गोविंद सिंगजी महाराजांचे सुपुत्र साहिबजादे अजीत सिंग, जुझार सिंग, जोरावर सिंग व फतेह सिंग यांच्या अद्वितीय शौर्य, बलिदान व देशभक्तीच्या स्मरणार्थ साजरा करण्यात आला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना वीर बालकांच्या इतिहासाची माहिती देण्यात आली. त्यांच्या त्यागातून धैर्य, सत्य, निष्ठा व राष्ट्रप्रेम यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी भाषण, कविता व विचारमंथनातून आपले मनोगत व्यक्त केले. विद्यालयाच्या वतीने वीर बालकांच्या बलिदानास अभिवादन करण्यात आले. अशा प्रेरणादायी कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, नैतिक मूल्ये व आत्मविश्वास वाढीस लागतो, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.यावेळी श्री साईबाबा निवासी दिव्यांग विद्यालय चे मुख्याध्यापक एस. बी. पाळेकर, डी एम. डाके, बी. एस.वाघमारे,आर.एम. वट्टमवार, एस. आर. तावडे, जी.डी. धडेवार, भूषण नरवाडे, पी.व्ही. मुधोळ, राठोड सर, रामलु सर, चंद्रकांत गुंडेवाड, येरेवाड मॅडम, गोवंदे मॅडम यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

## दहावीच्या वर्ग मित्रांची स्नेह मेळाव्यातुन ५१ वर्षांनंतर सहपत्नी भेट

**मुखेड** - येथून १९७४ साली १० वी पास झालेल्या वर्ग मित्रांचा सपत्नीक स्नेह मिलन मेळावा नांदेड येथे उत्साहात साजरा करण्यात आला असून ५१ वर्षांनंतर स्नेह मिलन मेळाव्यातुन सहपत्नीक भेटताना लहानपणीच्या आठवणी निघताच झाले अश्रू आणावंर झाले. नांदेड जिल्ह्यातील मुखेड नगरीचे भुमिपूत्र १९७४ साली १० वी पास झालेल्या त्या बॅचला ५१ वर्षे पूर्ण झालयाबद्दल सर्व वर्ग मित्रांनी नांदेड येथील विमानतळ रोडवरील हॉटेल सिटी सिम्फणी येथे स्नेह मिलन



मेळाव्याचे आयोजन केले होते. यावेळी सपत्नीक स्नेह मिलन मेळावा साजरा केला असून या कार्यक्रमाची सुरुवात सौ. पंकजा देशमुख, सौ. पुष्पा बियाणी, सौ.कलंत्री, सौ.वसुधा कोडगिरे, सौ.हिरेमठ यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून,दीप प्रज्वलन करून मेळाव्याची सुरुवात करण्यात आले यावेळी प्रास्ताविकात माजी कृषि संचालक सुरेश आंबुलगेकर म्हणाले की, १९७४ साली आपण सर्व वर्ग मित्र एका माळेतील मोती होतो. नंतर ही माळ तुटली. तब्बल ५१ वर्षानंतर पुन्हा ही माळ अथक परिश्रमाने जुंपली. महिलांचा सहभाग वाढवावा म्हणून सपत्नीक मेळावा घेतला.यापुढेही दरवर्षी २५ डिसेंबरला असाच मेळावा घेवू असे सांगितले. यावेळी महिलांनी मनोगत व्यक्त केले. सौ.वसुधा कोडगिरे म्हणाल्या की, संसार सुखी होण्यासाठी सद्गुरू ची आवश्यकता असते. सद्गुरु सन्मार्ग व ऊर्जा देतात. त्यातून जीवनाला उभारी येते. सौ.शिला पाळेकर म्हणाल्या की, महिलांनी नेहमी हसमुख असावे त्यामुळे ताण तणाव व दुःख कमी होते. स्वतः शी प्रामाणिक राहा जसकारात्मक दृष्टिकोन व उच्च ध्येय ठेवावे. यावेळी शहेनाज परविन, बालाजी ढगे, माजिदखान, यानीही मनोगत व्यक्त केले. स्नेह मिलन मेळावा यशस्वी करण्यासाठी मधुसूदन कलंत्री, सुरेश आंबुलगेकर, जगदिश बियाणी,शिवराज मुगावे, अंबादास देशमुख, प्रभाकर रेणगुंटवार, महंमद चौधरी, मोलाना सय्यद, मोरे, मल्लीकार्जून एकाळे, आदीनी परिश्रम घेतले. मेळाव्याची आठवण म्हणून एम.जे.एम. कॉलेज मध्ये ग्रुप फोटो घेण्यात आला. महिलांचा संगित खुर्ची हा खेळ झाला. मेळाव्याची आठवण म्हणून यावेळी भेट वस्तू देण्यात आली. निवृत्त जिल्हा माहिती अधिकारी सुरेश काचावार यांना वाढदिवसानिमित्त सौ.कालिंदी सुरेश काचावार यांचा पुष्पगुच्छ देवून शुभेच्छा देण्यात आल्या. मेळाव्याचे सुत्र संचालन अंबादास देशमुख यांनी केले.

## गजानन महाराज मंदिर आणि दत्त मंदिर संस्थानाकडून नवनियुक्त नगराध्यक्ष व नगरसेवकांचे सत्कार



**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. २७ डिसेंबर-**

येथील गजानन महाराज आणि दत्त मंदिर संस्थान यांच्याकडून नवनियुक्त नगराध्यक्षा विजयमाला बालाजी टेकाळे तसेच नगरसेवक आणि नगरसेविका यांचे सत्कार करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आले.

दरम्यान या मंदिरात पुजा अर्चा आणि आरती करण्यात आली. सर्व भाविक भक्ताच्या उपस्थित नवनियुक्त नगराध्यक्ष आणि नगरसेवक, नगरसेवक प्रतिनिधी यांचे मंदिर संस्थान यांच्याकडून सत्कार करण्यात आले. यामध्ये नवनियुक्त नगराध्यक्षा सौ. विजयमाला बालाजी टेकाळे, नगरसेविका पदमवार उज्वला लक्ष्मीकांत, नगरसेवक शाखावार नंदकिशोर लक्ष्मण, टेकाळे (बबलू) एकनाथ शेषराव, नगरसेविका कडलवार शोभा दिगंबरराव, मैलागिरे रोहिणी बालाजी, तोटावर योगेश्वरी लक्ष्मण, कौरवार रत्नमाला रमेशराव, कांबळे मीनाक्षी व्यंकट, मोरे कलावती माधवराव, नगरसेवक दयाडे पल्लवी रुपेश, इतापे प्रेमला दत्तात्रेय, बोन्लावार अनिल गंगाराम, तसेच संजय जोशी, नाना मोरे, बालाजी मैलागिरे, व्यंकट कांबळे यांच्यासह आदींचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी मंदिर संस्थान अध्यक्ष रमेश कंतेवार, सचिव दिनेश मुनगीलवार, सायलू तैदलवार, शंकर अप्पा मठपती, अशोक पैनसलवार, प्रमुख विश्वस्त नारायण तोटावार, जेष्ठ पत्रकार अविनाश देसाई हसनाळकर आणि मोठ्या प्रमाणात भाविक भक्त उपस्थित होते.

# संशोधनातून उद्योगाकडे : स्वारातीम विद्यापीठात डॉ. महेश कस्तुरे यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २७ डिसेंबर-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील संशोधन व उद्योग क्षेत्र यांच्यात दृढ सहकार्यासंबंध (सिनर्जी) प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने विद्यापीठाचे माजी विद्यार्थी व भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडचे मुख्य व्यवस्थापक (संशोधन व विकास) डॉ. महेश कस्तुरे यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन आज दि.२७ डिसेंबर, २०२५ रोजी आयोजित करण्यात आले.

हा कार्यक्रम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, डॉ. पी. ए. खडके, डॉ. सी. आर. बाविस्कर तसेच वित्त व लेखा अधिकारी डॉ. पराग भालचंद्र, संगणकशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. निलेश देशमुख, डॉ. शशिकांत ढवळे यांच्या सान्निध्यात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी या उपक्रमाचे स्वागत करत, विद्यापीठातील संशोधन क्षमतेला उद्योग क्षेत्राशी जोडण्यासाठी डॉ. कस्तुरे यांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली. उद्योग व शैक्षणिक संस्थांमधील सहकार्य वाढल्यास संशोधन अधिक परिणामकारक व समाजोपयोगी ठरेल, असे त्यांनी नमूद केले.

उद्बोधनात डॉ. महेश कस्तुरे यांनी विद्यापीठातील नाविन्यपूर्ण संशोधन उद्योगांच्या गरजांशी संलग्न करून प्रत्यक्ष जीवनात उपयोजन करण्याचा भविष्यदर्शी दृष्टिकोन मांडला. सध्या सुरू असलेल्या संयुक्त उपक्रमांचा आढावा घेताना, उद्योग क्षेत्रातील सुरक्षितता वाढविणारी ऑप्टिकल फायबर आधारित अमोनिया शोध प्रणाली तसेच प्रायोगिक टप्प्यातील शैवाल-आधारित जलशुद्धीकरण तंत्रज्ञान या प्रकल्पांची माहिती त्यांनी दिली.

स्टार्टअप निर्मिती व संशोधनासाठी निधी उपलब्धतेवर भर देत, डॉ. कस्तुरे यांनी बीपीसीएल 'अंकुर स्टार्टअप निधी' अंतर्गत हरित तंत्रज्ञान व सायबर सुरक्षा क्षेत्रातील योजनांची माहिती दिली. अमोनिया शोध प्रणालीवर आधारित स्टार्टअप प्रस्ताव सादर करून संशोधकांनी या निधीसाठी अर्ज करावा, असे आवाहन त्यांनी केले.

राष्ट्रीय प्राधान्यक्रमांचा उल्लेख करताना त्यांनी हरित हायड्रोजन क्षेत्रातील आव्हाने व त्यामधील व्यापक संशोधन संधी अधोरेखित केल्या. तसेच प्लास्टिक कचऱ्याचे रस्ते बांधकामासाठी उपयुक्त साहित्यामध्ये रूपांतर करणाऱ्या यशस्वी सहकार्याचे उदाहरण देत, उद्योगशैक्षणिक भागीदारीमुळे होणाऱ्या ठोस परिणामांवर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी डॉ. कस्तुरे यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील संशोधन प्रकल्प प्रस्तावांच्या मूल्यमापनासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. अशा सुसंवादी भागीदारीमुळे विभागीय क्रमवारीत सुधारणा, बीपीसीएलसारख्या नामांकित कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिपच्या संधी आणि शैक्षणिक संशोधनाचा समाजहितासाठी प्रत्यक्ष लाभ सुनिश्चित होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाचे संयोजन सीआयसीएमआरआयचे संचालक डॉ. कृष्ण चैतन्य, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर तसेच आयक्यूएसीचे संचालक डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी यांनी केले.

## सकारात्मक विचारांमुळे मानसिक स्वास्थ उत्तम राहण्यास मदत होते : डॉ. सौदागर



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २७ डिसेंबर-**

मानवी जीवनात स्वास्थाला अनन्यसाधारण महत्त्व असून सकारात्मक विचारांमुळे मानसिक स्वास्थ उत्तम राहण्यास मदत होते, असे प्रतिपादन डॉ. एम. एफ. सौदागर यांनी केले. ते नांदेड सिडकोच्या इंदिरा गांधी महाविद्यालयातील स्टाफ स्टडी सर्कलच्या वतीने आयोजित 'ग्रंथावर बोलू काही' या उपक्रमांतर्गत प्राचार्य कुलकर्णी लिखित 'माईंड जिम ॲण्ड पार्लर' या ग्रंथावर ते बोलत होते. विचारपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे, स्टडी सर्कलचे समन्वयक डॉ. हनुमंत भोपाळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सौदागर पुढे बोलताना म्हणाले की, प्रस्तुत ग्रंथ वाचल्यानंतर शारीरिक स्वास्थ आणि मानसिक स्वास्थाचे महत्त्व प्रकर्षाने जाणवते आणि वाचकांना आरोग्याची काळजी घेण्याची प्रेरणा मिळते. व्याख्यानाच्या शेवटी डॉ. सौदागर यांनी उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य दुर्गेश रवंदे यांनी कुलकर्णी लिखित 'माईंड जिम ॲण्ड पार्लर' हा ग्रंथ वाचकांना आरोग्याची काळजी घेण्यासाठी मदत करतो. हल्ली अशा ग्रंथांची मोठ्या प्रमाणात मागणी वाढत आहे. सर्वांनी आरोग्यसंबंधी वाचले पाहिजेत, असा मौलिक सल्ला दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. हनुमंत भोपाळे यांनी केले, तर आभार प्रा. बी.एल. जाकोरे यांनी मानले. या कार्यक्रमास प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.

# मुनेश्वर बंधूची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २७ डिसेंबर-**

लातूर येथे संपन्न झालेल्या शिक्षक , कर्मचारी व अधिकारी विभागीय स्पर्धे त रमेश मुनेश्वर यांनी एकपात्री अभिनय व रूपेश मुनेश्वर यांनी स्वरचित काव्य सादरकीरण स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावल्याने तालुक्यातील या दोन शिक्षक बंधूची राज्यस्तरीय स्पर्धे करिता निवड झाल्याने सर्वत्र त्यांचेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र , पुणे व जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था यांच्या वतीने दयानंद महविद्यालय , लातूर येथे शिक्षक , कर्मचारी व अधिकारी यांच्या विभागीय स्पर्धा आयोजित केल्या होत्या. तालुक्यातून प्रथम आलेल्या स्पर्धकांना यात सहभागाची संधी होती. यावेळी भूमिका अभिनय या क्षेत्रातील व्यसनाधीनतेवर मात या विषयावर तालुक्यातील शनिवारपेठ केंद्रातील दरसांगवी ( चि ) जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक रमेश यादवराव मुनेश्वर यांनी 'मी हरलो होतो पण जिंकलो ' ही एकपात्री नाटिका सादरकरून आणि स्वलिखित काव्य लेखन आणि सादरीकरण स्पर्धे त मोहपूर केंद्रातील लक्कडकोट जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील उपक्रमशील शिक्षक रुपेश माधवराव मुनेश्वर यांनी शेतकऱ्यांच्या वेदना मांडणारी ' शेतकरी बाप ' ही कविता बहारदार सादर करून विभागातून प्रथम क्रमांक पटकावला.

या शिक्षक बंधूंची राज्यस्तरीय स्पर्धे करिता निवड झाल्याबद्दल डायटचे प्राचार्य अमोल निळेकर जिल्हा परिषद, नांदेडच्या शिक्षणाधिकारी (प्रा) वंदना फुटाने, शिक्षणाधिकारी (मा) माधव सलगर, शिक्षणाधिकारी (यो) दिलीपकुमार बनसोडे, किनवट पंचायत समितीचे गट शिक्षणाधिकारी अनिलकुमार महामुने, शिक्षण विस्तार अधिकारी शिवशंकर जम्पलवाड, मनिषा बडगीरे, केंद्र प्रमुख उत्तम कानिंदे, राम बुसमवार, पद्माकर कवटीकवार, रमेश राठोड, रमेश खूपसे, विजय मडावी, राजेश्वर जोशी, चंद्रकांत मोरे, सुरेश पाटील, शेषराव पाटील, अखिल भारतीय शिक्षक साहित्य कला क्रीडा मंडळाचे राज्याध्यक्ष नटराज मोरे, इब्टाचे जिल्हाध्यक्ष बालासाहेब लोणे आदी मान्यवरांसह बहुसंख्य शिक्षक बंधू-भगिनिंनी त्यांचे अभिनंदन केले आहे.